मंगळवार, 02 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 09
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●TUESDAY 02 AUGUST 2022 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-02 ●ISSUE-09 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5

## हर हर महादेव ...!



**खुलताबाद :** श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवार निमित्ताने तालुक्यातील जगप्रसिद्ध श्रीक्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वराचे दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच मोठी गर्दी केली होती. दरम्यान हजारो शिवभक्तांनी दर्शन घेतले. यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाचे वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ज्येष्ठ संपादक दिलीप धारूरकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ज्येष्ठ संपादक तथा माजी मुख्य माहिती आयुक्त दिलीप धारूरकर यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. देवगिरी तरुण भारतचे संपादक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित झालेले दिलीप धारूरकर यांनी अनेक महत्त्वाचे पदे भूषवली आहेत. धडाडीचे पत्रकार म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख होती. दैनिक तरुण भारत मध्ये काम करताना त्यांनी अनेक पत्रकार घडवले आहेत. शांत आणि संयमी स्वभावामुळे अनेक पत्रकारांचे मार्गदर्शक म्हणून त्यांना ओळखले जाते. देशामध्ये माहिती अधिकार लागू झाल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांच्या अचानक निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे. सायंकाळी सहाच्या दरम्यान प्रतापनगर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सदस्य, पत्रकार, राजकीय, सामाजिक तसेच सर्व क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

**चतुरस्त्र व्यक्तिमत्व गमावले : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

ज्येष्ठ पत्रकार, संपादक तथा राज्याचे माजी मुख्य माहिती आयुक्त दिलीप धारूरकर यांच्या निधनामुळे परखड पत्रकार आणि विचारवंत असे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व गमावले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धारुरकर यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहिली आहे.

**माहिती आयुक्त म्हणून उत्कृष्ट काम केले : उपमुख्यमंत्री**

माजी माहिती आयुक्त, ज्येष्ठ पत्रकार दिलीप धारूरकर यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. विदर्भात माहिती आयुक्त म्हणून त्यांनी अतिशय उत्कृष्ट काम केले आणि इतरही भागातील प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यासाठी मोठा पुढाकार त्यांनी त्यांच्या कार्यकाळात घेतला. राष्ट्रवादी विचारांना बळकटी देणारे मोठे लेखन कार्य त्यांनी केले. एक उत्तम संपादक, वैचारिक स्तंभलेखक म्हणून ते कायम स्मरणात राहतील. अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धारूरकर यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

# तेंव्हा तुमचे काय होईल ?

## उद्धव ठाकरेंचा भाजपला गर्भित इशारा



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राजकारणाची तुलना सहसा बुद्धिबळाशी केली जाते. पण आजच्या राजकारणात फक्त बळाचा वापर केला जात आहे. आज तुमच्याकडे बळ आले म्हणून तुम्ही सगळ्यांना संपवत आहात. पण दिवस हे नेहमी सारखे नसतात. जेव्हा हे दिवस फिरतील, तेव्हा तुमचे काय होईल याचा विचार भाजपने करावा, असा गर्भित इशारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला. ते सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.**

यावेळी उद्धव ठाकरे यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी बिहारमध्ये केलेल्या भाषणाचा समाचार घेतला. जे.पी. नड्डा यांनी आगामी काळात देशातील सर्व प्रादेशिक पक्ष संपतील आणि फक्त भाजपच उरेल, असे वक्तव्य केले होते. इतर पक्षात २०-३० वर्षे राहिलेले नेते भाजपमध्ये येत आहेत, असे जे.पी. नड्डा म्हणाले. तसेच आमचा घराणेशाहीला विरोध आहे, असे नड्डा यांनी म्हटले होते. त्याला प्रत्युत्तर देताना उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, इतर पक्षातील नेते भाजपमध्ये येत असतील तर भाजपचा वंश तरी नेमका कुठून सुरू होतो, हे नड्डा यांनी सांगावे. आजचे राजकारण हे निर्घृण आणि घृणास्पद आहे. भाजप त्यांच्यासोबत येणाऱ्यांना गुलाम बनवते. या गुलामांची गरज संपली की नंतर त्यांना बाजूला करून नवे गुलाम भरती करते, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.
यावेळी उद्धव ठाकरे यांनी ईडीच्या अटकेत असलेल्या संजय राऊत यांच्याबाबतही भाष्य केले. मला संजय राऊत यांच्याविषयी अभिमान आहे. संजय माझा जुना मित्र आहे. आज मी त्याच्या घरी जाऊन त्याच्या आई, बहिणी आणि मुलींची भेट घेतली. संजयचा गुन्हा काय होता? संजय पत्रकार आहे, शिवसैनिक आहे. निर्भीड आहे आणि जे पटत नाही ते बोलतो. संजयने काल म्हटलेली एक गोष्ट महत्त्वाची आहे. मरण आले तरी शरण जाणार नाही, हे संजयने म्हटले. हे फार महत्त्वाचे आहे. तोदेखील शरण जाऊ शकला असता. जे आत्ता शरण गेले आहेत, ते सध्या हमामध्ये आहेत. सध्या त्यांच्याभोवती सत्तेचा फेस आहे. त्यामुळे ते आमच्यावर टीका करत आहेत. एकदा का हा फेस बाजूला झाला की त्यांना आणि लोकांना नेमकी परिस्थिती काय, याची जाणीव होईल, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.


# ४ ऑगस्टपर्यंत राऊतांना ईडी कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांना तीन दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणी अटक केल्यानंतर संजय राऊत यांना आज ईडी कोर्टात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान, ईडीने संजय राऊत यांना आठ दिवसांची कोठडी देण्याची मागणी केली होती. संजय राऊत यांच्या वकिलांनी कोठडी द्यायची असेल तर आठ दिवसांपेक्षा कमी द्यावी अशी मागणी केली होती. यानंतर कोर्टाने संजय राऊतांना ४ ऑगस्टपर्यंत कोठडी सुनावली आहे. न्यायमूर्ती एम जी देशपांडे यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. दरम्यान वैद्यकीय कारणास्तव रात्री १०.३० नंतर संजय राऊत यांची चौकशी करणार नाही अशी हमी यावेळी ईडीने कोर्टात दिली आहे. विशेष सरकारी वकीत हितेन यांनी संजय राऊत आणि त्यांच्या कुटुंबाला १ कोटी सहा लाखांचा फायदा झाल्याचे सांगितले. ईडीने यावेळी प्रवीण राऊत हे संजय राऊतांचे फ्रंट मॅन असून आमच्याकडे किहीममधील जमीन विक्रेत्यांचे काही मालमत्तांबाबत जबाब असल्याची माहिती दिली. पुराव्यांसोबत छेडछाड करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही यावेळी ईडीकडून करण्यात आला.
संजय राऊत यांच्या वतीने वकिलांनी आठ दिवसांची कोठडी देण्यास विरोध दर्शवला. राजकीय सुडापोटी ही कारवाई करण्यात आल्याचा आरोपही त्यांच्याकडून करण्यात आला.


# पृथ्वी फिरत नाही तर धावत आहे

## २४ तासातला वेग पाहून शास्त्रज्ञांची झोप उडाली



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पृथ्वी २४ तासांमध्ये एक परिक्रमा पूर्ण करते आणि तोच आपल्याकडे एक दिवस होतो. मात्र, आता पृथ्वीच्या अक्षावर फिरण्याचा वेग वाढतो का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कारण, १९ जुलै रोजी, सर्वात लहान दिवस म्हणून पृथ्वीने विक्रम मोडला. यादिवशी मानक २४ तासांपेक्षा १.५९ मिलीसेकंद कमी वेळेत आपली कक्षा पूर्ण केली.
'द इंडिपेंडंट'च्या रिपोर्टनुसार, पृथ्वीचा वेग अलिकडे वाढत चालला आहे. २०२० हा, पृथ्वीचा १९६० नंतरचा सर्वात लहान महिना ठरला. यावर्षी १९ जुलै हा सर्वात लहान दिवस मोजला गेला. सामान्य १४ तासांच्या दिवसापेक्षा हा १.४७ मिलिसेकंद कमी होता.
यानंतर २०२१ मध्येदेखील ग्रहाचा फिरण्याचा वेग हा वाढत होता. पण यावेळी कोणत्याही विक्रमाची नोंद करण्यात आली नाही. दरम्यान, 'इंटरेस्टिंग इंजिनिअरिंग (IE)' नुसार, या लहान दिवसांच्या ५० वर्षांच्या टप्प्याची सुरुवात असू शकते. दरम्यान, पृथ्वीच्या अशा वेगवेगळ्या फिरण्याच्या गतीबद्दल शास्त्रज्ञांनी अद्याप कोणतीही ठोस माहिती दिली नाही. तर त्यांचा असा अंदाज आहे की हे पृथ्वीच्या गाभ्यामध्ये अंतर्गत किंवा बाह्य पृष्ठभागावरील प्रक्रिया, महासागर, भरती-ओहोटी किंवा हवामानातील बदलांमुळे असू शकते.
'इंडिपेंडंट'च्या अहवालानुसार, जर पृथ्वी वाढत्या वेगाने फिरत राहिली तर निगेटिव्ह लीप सेकंदांचा वापर महत्त्वाचा ठरेल. हे एकप्रकारे काही सेकंदांना काढून टाकण्यासारखे आहे किंवा अणु घड्याळाची वेळ बदलणे आहे जेणेकरून सूर्याभोवती पृथ्वीच्या परिभ्रमणाचा वेग सुसंगत ठेवला जाईल. निगेटिव्ह लीप सेकंद जोडल्याने काही तोटे देखील होतील. उदाहरणार्थ, सौर वेळेनुसार सेट केलेल्या स्मार्टफोन, कॉम्प्युटर आणि कम्युनिकेशन सिस्टमवर याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होईल. बऱ्याच शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, हे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे मोठं नुकसान होईल.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## ' तेच ते... '

आधुनिक केसरी

म्हणजे नेमकं काय होते ? आपला मूळ अर्थ गमावून बसतात. आपल्या बऱ्याचशा प्रथा, परंपरांचं असंच होतं नाही का ? एक किस्सा आठवला. एक गुरु होते. आपल्या शिष्याना ते शिकवत ( अर्थात शिकवणं हेच त्यांचं काम ! दुसरे लोक दुसरं काही करत असतील तर माहिती नाही ) असत. तर शिकवताना व्हायचं काय की एक मांजर त्यावेळी तेथे येऊन त्यांना त्रास द्यायचं. मग ते गुरु आपल्या शिष्यांना त्या मांजराला बांधून ठेवायला सांगत आणि आपले शिकवणे सुरु करीत. पुढे काही काळानंतर ते गुरु निवर्तले. त्यांची जागा त्यांच्या एका शिष्याने घेतली. तो गुरुपदी जाऊन बसला. पण नियमानुसार तो आपले प्रवचन सुरु करण्याआधी त्या मांजराला त्याच्या शिष्यांना बांधून ठेवायला सांगत असे. पुढे ते मांजरही मेले. शिष्यांनी दुसरे एक खास मांजर धरून आणले. ते बांधले आणि मग प्रवचन सुरु झाले. अशा या काही काही गमतीदार (आणि निरर्थकही )परंपरा !

आपण कोणत्याही सरकारी कचेरीत ( शुद्ध मराठीत ऑफिसात ! ) गेलो की तेथील अधिकारी, कर्मचारी आपल्याला कोणत्याही कामासाठी ' विहित नमुन्यात ' अर्ज करायला सांगतात. अर्थात ' विहित नमुन्यात ' अर्ज केल्यानंतर तुमचे काम ' विहित नमुन्यातच 'होईल असे काही सांगता येत नाही. ( काही वेगळे मार्ग तुम्हाला अवलंबावे लागू शकतात ! ) अगदी तलाठी कार्यालयात गेले तरी तो आपल्याला विहित नमुन्यात अर्ज करायला सांगतो. मग माझ्यासारखा थोडंफार चार बुकं शिकलेला पण सरकारी कामांशी फारसा परिचित नसलेला माणूस विचारतो, ' भाऊसाहेब, विहित नमुन्यात म्हणजे कसा हो ? ' यावर भाऊसाहेब अत्यंत दयाळू, कृपाळू वगैरे होऊन माझ्यासारख्या माणसाच्या अज्ञानाची कीव करत मला तो विहित नमुना दाखवतात. ( का कुणास ठाऊक, पण मला दोन विहित नमुने दिसत असतात ! ) मग माझ्या डोक्यात प्रकाश पडतो.

' अच्छा ! असं आहे का ? द्या बरं मला तो विहित नमुना. मी आपल्याला भरून देतो. ' पुन्हा माझं अज्ञान प्रकट होतं. भाऊसाहेब पुन्हा कृपाळू वगैरे होऊन आणि प्रयत्नपूर्वक तोंडातील बार सांभाळून ( आता मी अज्ञानी आहे हे त्यांना माहित झालेलं असल्याने ) मला समोरच्या झेरॉक्सच्या दुकानाकडे बोट दाखवून सांगतात, ' तिथे मिळेल तुम्हाला तो अर्ज. ' मी आपला जातो तिथे. तो विहित नमुन्यातील अर्ज चतकोर कागदावर झेरॉक्स केलेला असतो. झेरॉक्सवाला माझ्याकडून तेवढ्याचे केवळ नाममात्र पाच रुपये शुल्क घेऊन तो अर्ज मला देतो. मला तो अर्ज पाहिल्यावर वाटते, ' अरेच्या ! हे इतकं सोपं आहे होय ! हे तर मी पण एखाद्या कागदावर लिहून देऊ शकतो.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### सतत आनंदानुभूती घेत राहावी

आधुनिक केसरी

आनंदप्राप्तीला काही पर्याय आहे का? अनेक आनंदी व्यक्ती असे समजतात की आनंद ही एखादी वस्तू निवडण्यासारखी गोष्ट आहे. अशा व्यक्ती प्रत्येक दिवशी जाणूनबुजून नक्की काय निवडणे गरजेचे आहे ते स्वतःच ठरवत असतात, त्यांच्यावरच ते सर्व अवलंबून असते. आनंदी व्यक्ती त्यांना प्राप्त झालेल्या परिस्थितीमुळे बंदिस्त नसतात आणि ते इतर व्यक्ती किंवा संपत्तीमध्ये आनंद शोधत नाहीत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आनंद हा सर्वात महत्वाचा अनुभव असतो, तो ज्याचा त्यानेच प्राप्त करायचा असतो. जे आपल्यावर प्रेम करतात, ज्यांच्यावर आपण प्रेम करतो अशा व्यक्तींकडून देखील आपल्याला आनंद मिळेलच असं नाही. आपण जे काही प्रयत्न करतो, त्यात आपल्याला नेहमी आनंदी राहायचे असते आणि आपल्या सभोवतालचे लोक आनंदी असावेत असं वाटत असतं. कारण त्यामुळे आपल्या सभोवतालचा परिसर देखील आनंदानाभूती देऊ लागतो. केवळ अधूनमधून बरं वाटण्यापेक्षा नेहमीच चांगले वाटले पाहिजे, अनेक कारणांसाठी आपल्या जीवनात आनंदाची गरज असते.

बहुतेक व्यक्तींसाठी आनंद म्हणजे बरे वाटणे; हे नकारात्मक प्रभावापेक्षा सकारात्मकतेचे प्राबल्य आणि जीवनातील समाधानाची सामान्य भावना दर्शवत असते. आनंद हे अंतिम ध्येय असावे, परंतु ते साध्य करण्यासाठी आपल्याला अभ्यासपूर्वक विचार, वर्तन आणि व्यवहार करणे देखील आवश्यक असते. आनंद हे मानवी अस्तित्वाचे ध्येय असल्याचे म्हंटले जाते, कारण ते साधन नसून अंतिम सत्य असते. संपत्ती, सामाजिक स्थान, व्यक्तिगत दर्जा आणि व्यक्तिमत्व यासारख्या गोष्टी माणसाला आनंदी बनवण्याचे साधन आहेत, पण मग या गोष्टी अस्तित्वाचे ध्येय कसे असू शकतात? आनंद ही एक भावनिक अवस्था असते, जी आनंद, समाधान, शांती आणि तृप्तीच्या भावनांनी दर्शविली जात असते.



आधुनिक केसरी

### गिरवीतो रोज | बाराखडी ||

संथ गाणे माझे | अभंग ते व्हावे ||
संत रूप गावे | शब्दांतूनी ||१||

संतवचनांचा | घडो नित्य संग ||
होऊ नये भंग | समाधीचा ||२||

विचार मोहाचा | गळूनी पडावा ||
सत्संग घडावा | रात्रंदिन ||३||

अहंकारा अंगी | क्लेशाचे कुंपण ||
हरिचे चिंतन | कैसे घडे? ||४||

ज्ञाना-तुका संगे | अभंगाचे गुज ||
गिरवावी रोज | बाराखडी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांची नांवें ॥**
**नेघे माझे वाचे तुटी । महा लाभ फुकासाठी ॥**
**विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥**
**तुका म्हणे जपें । संतांचिया जाती पापें ॥**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

या अभंगात संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री तुकोबाराय म्हणतात की, सज्जनांची नावे आपण मुखाने घ्यावीत, म्हणजे पुण्यवंत होता येईल. हा लाभ विनासायास अशा प्रकारचा आहे. मी माझ्या वाणीने सज्जनांची नावे घेऊन पुण्यसंचय करून घेणार आहे. संतांच्या पायी भक्तीभाव हा विश्रांतीचा ठाव आहे. अभंगाच्या शेवटच्या चरणात संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री तुकोबाराय म्हणतात की, संतांचे नामस्मरण केल्यामुळे पापे जातात. अर्थात नाहीसे होतात.

या अभंगात संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री तुकोबारायांनी संत सज्जनांचे महिमान सांगितले आहे. हे संत कसे असतात, तर त्याचे उत्तर तुकोबाराय दुसऱ्या एका अभंगात देतात की,

तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति वानूं ॥१॥
अवतार तुम्हां धराया कारणें । उद्धराया जन जड जीव ॥२॥
वाढावया सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबांचे ॥३॥
तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संतजन ॥४॥

असे जे संत आहेत, ज्यांना आपण परम भागवत असे देखील म्हणतो, त्यांचे नामाचे स्मरण करणे सुद्धा बहु पुण्यकारक आहे. माणसाला त्रिविध ताप असतात, त्या पासून विश्रांती ही संतांच्या चरणी भक्तीभाव असता लाभते. हा लाभ विनासायास आहे. या साठी फार कष्ट करावे लागत नाहीत. म्हणून सर्वांनी संतांचे नामस्मरण करावे. त्यांची चरित्रे ऐकावीत. शांतीब्रह्म संत श्री एकनाथ महाराज सुद्धा कीर्तन मर्यादा सांगताना म्हणतात,

सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।
सज्जन वृन्दे मनोभावे आधी वंदावी।।

आपणा सर्वांना पंढरीश माय बाप कृपे करून असाच पुण्यसंचय घडावा, ही शुभकामना.

## ।। दासबोध स्तवन ।।



### "नैमिशारण्याचं महत्व"

आधुनिक केसरी

।।ॐ नमो भगवते वासुदेवाय।।

चार महिन्यापूर्वी माझी मैत्रीण सौ ,विद्या बेळंबेचा फोन आला. की नैमिशारण्यात भागवत कथा सप्ताह आहे. तुम्ही दोघांनी यायचं आहे. नुसतं फोनच नाही तर पुढच्या आठ दिवसांनी विमानाचं तिकिट काढल्याचा मेसेज. (मैत्रं असावं तर असं) मग काय मी तर विमान प्रवास होणार व भागवत कथेचे ज्ञानामृत चाखायला मिळणार म्हणून हवेत अक्षरशः तरंगत होते. अखेर 17 जुलैला पहाटे 5 वाजता आम्ही विमानतळावर पोहचलो सगळे सोपस्कार झाले व आमचं विमान दिल्लीच्या दिशेला वेगाने झेपावले. दिल्ली ते लखनौ एक तासाचा प्रवास करून आमच विमान एकदाच लँड झाले. आता आमच्या शारीरिक सहन शक्तिची परिक्षा घेतली गेली कारण 20/25टेंप्रेचरमधून आलेलो सर्व प्रवासी एकदम,48'/'टेप्रेचरला तोंड देत आम्ही नैमिशारण्याच्या दिशेला प्रस्थान केल.नैमिशारण्यात पोहचलो.सर्व भाग अतिशय पवित्र व शुध्द हवा प्रत्यक्ष भगवंताचं,ऋषी मुनींच अधिष्ठान असलेलं नैमिशारण्यात मी आले यावर माझा विश्वास बसतं नव्हता. नैमिशारण्या हे मकररेखांशावरून जाणारा प्रदेश आहे ईकडे ऊन्हाळा कडक असतो. आँगस्ट पासून पावसाला सुरवात होते. **(क्रमशः)**



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भोजनाचा मनावर होणारा परिणाम

आधुनिक केसरी

भोजनाचा मनावर काय परिणाम होतो ? यावर आपण एक उदाहरण बघू. तीन महिन्यांसाठी एक प्रयोग करून बघा. सात्त्विक अन्न खाण्यामुळे आपल्यात एक प्रकारचा बदल दिसून येतो. कारण जसे अन्न, तसे मन होते. सात्त्विक अन्न हे फक्त शाकाहारी नाही, तर ते ईश्वराचे स्मरण करून बनवलेले अन्न असते. जर आपण रागाच्या भरात स्वयंपाक केला असेल, तर त्यास सात्त्विक अन्न म्हणत नाहीत. म्हणून स्वयंपाक करणाऱ्याने कधीही रागाच्या भरात, उदास, नाराज होऊन स्वयंपाक करू नये. (जेवण बनवू नये. अन्न शिजवू नये.) तसेच स्वयंपाक करत असताना कधीही आईला, बहिणीला, पत्नीला (जे कोणी स्वयंपाक करत असतील, त्यांना) ओरडू नये, रागवू नये, त्यांच्याशी भांडू नये. कारण त्या स्थितीत त्या स्वयंपाकघरामध्ये जाऊन स्वयंपाक करत असताना, त्या पदार्थांत त्याच प्रकारची (सर्व रागाची) स्पंदने जातात आणि तेच आपण खाणार असतो. ही लक्षात ठेवण्याची महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. आणि म्हणूनच पूर्वी सोवळ्याने स्वयंपाक करण्याची पद्धत होती. भोजन तीन प्रकारचे असते. (१) जे आपण हॉटेलमध्ये खातो, (२) जे घरात आई, पत्नी बनवते आणि (३) जे आपण मंदिरात अन्नकोटात खातो, ते भोजन. तिन्ही भोजनांत वेगवेगळी स्पंदने असतात.

(१) हॉटेलमध्ये पदार्थ बनवतात, ते विकत घेऊन खावे लागते. ते आपण नेहमी खाल्ल्यास त्यातील स्पंदने आपणास आंतरिक समाधान देत नाहीत. त्यामुळे कधी कधी त्या अन्नाने आपणास त्रासही होतो. ते पदार्थ कोण शिजवतं, त्यावेळी त्याच्या मनात काय चालले आहे, त्याचा भाव कोणता आहे, ते सगळं त्या अन्नात उतरतं, तेच संस्कार त्या अन्नावर होतात. तोच भाव आपल्यात उतरतो.

(२) घरात आई, पत्नी जे पदार्थ करते, ती फार प्रेमाने करत असते. म्हणून त्या पदार्थांत सात्त्विक स्पंदने असतात, ती आपणास समाधानी बनवतात. परंतु हल्ली अनेक घरात स्वयंपाकी ठेवले जातात. त्यांच्या मनातील विचार आपणास सुख देत नाहीत. घरात मुलगा जेवत असेल आणि आपल्या आईला म्हणत असेल, की मला अजून एक पोळी वाढ. तेव्हा आईचा चेहरा आनंदाने फुलून येतो. ती अजून प्रेमाने एक पोळी त्याला वाढते. त्यात तिचे प्रेम असतं, आनंद असतो. पण हेच आपण स्वयंपाक्याकडे मागितले, तर तो वाढेल; पण त्यात प्रेम असेलच, असे नाही. असे जेवण अंगी लागत नाही.

(३) मंदिरात अन्नकोटात आपण जे खातो, तो भगवंतास दाखवलेला प्रसाद असतो. ती भावना प्रसादाची असते. ते अन्न ईश्वराला स्मरण करून शिजवलेले असते म्हणून ते अन्न प्रसाद होते.

आपणही रोज घरात ईश्वरासाठी भोजन बनवत आहोत, असे समजून त्याच्या स्मरणात अन्न शिजवावे म्हणजे तो प्रसाद होईल. यासाठी आपले स्वयंपाकघर स्वच्छ ठेवा, मन शांत ठेवा, देवाचे भजन किंवा गीत लावा किंवा नामस्मरण करत स्वयंपाक करावा म्हणजे रोज प्रसादच भक्षण होईल. स्वयंपाक करताना अनेक उपायही करता येतात. घरात काही त्रास असेल, तर त्यावर हा एक उपाय आहे. ती गोष्ट चांगली व्हावी म्हणून परमेश्वराकडे प्रार्थना करत स्वयंपाक करावा.

परमेश्वरास प्रार्थना करावी, की हे अन्न खाणाऱ्यांच्या मनात एकमेकांविषयी प्रेम , वात्सल्य, आपुलकी, विश्वास निर्माण होऊ दे. त्यांच्या मनात शांती निर्माण होऊन सकारात्मकता, तुझ्याविषयी श्रद्धा निर्माण होऊ दे, अशी प्रार्थना अन्न शिजवताना मनातल्या मनात म्हणत जा. अन्नात जादू आहे आणि त्यावर स्वयंपाक करताना होणाऱ्या संस्कारांचाही परिणाम होतो. स्वयंपाक करणाऱ्याच्या मानसिक भावभावनांच्या संस्कारांचा त्याच्यावर विलक्षण परिणाम होतो. आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे भाजी असो, कुकर असो, काही असो, त्या पात्राला हात लावून कृष्णार्पणमस्तु म्हणून नमस्कार करा. मग बघा, काय जादू होते. सगळी आसपासची सूक्ष्म स्पंदनं संपून जातील आणि उरेल किंवा तयार होईल प्रसाद.!

# खेळा पत्ते-खेळा जुगार गुरुजींना अटक केले : तरीही नोकरी राहते अबाधित वरतून मिळतो पगार....!

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड : (भाग : ३)** सदरील शिक्षकांना निलंबित केल्यानंतर ते आपल्या दिलेल्या शाळेवर रुजू न होता आयुक्ताकडे अपील करतात. अप्पर आयुक्त त्यांचे अपील फेटाळतात. सीईओ यांचा निर्णय योग्य म्हणतात. विजय चांदेकर अप्पर सचिव विजय चांदेकर यांनाच हा निर्णय अयोग्य का वाटतो....? हे जनतेसमोर येणे नितांत गरजेचे वाटते. प्रत्यक्ष शिक्षकांना जुगार खेळताना पकडले असताना त्यांची चार्जशीट दाखल झाली असताना व संबंधितावर गुन्हे नोंद असल्यामुळे त्यांना जामीन मिळाला. पण ते निर्दोष सुटलेले नाहीत. हे ही जि.प. प्रशासनाने अप्पर सचिव विजय चांदेकर व राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या लक्षात आणून देणे गरजेचे होते. पण ते घडले नाही आणि घडले असलेतरी या दोघांनी ते ऐकलेले दिसून येत नाही. जसे की, उदाहरणार्थ अंबाजोगाई येथील सक्तीने निवृत्त केलेले मुख्याध्यापक अशोक केरबा घायाळ यांना त्यांच्या हक्काचे निवृत्तीवेतन आजपर्यंत दिले जात नाही. शिवाय त्यांच्यावर खोटे-नातटे गुन्हे दाखल असूनही त्यांना गेल्या दोन-अडीच वर्षांपासून अत्यंत किळसवान्या पद्धतीने छळले जाते. शिवाय इतरही छोट्या-मोठ्या गुन्ह्यात निलंबित केलेल्या शिक्षकांना तात्काळ सेवेत रूजू करून न घेता त्यांना अनेक दिवस टातकळत ठेवले जाते. जरी करता रुजू करून घेतले तरी, परत त्यांना मूळ शाळा न देता इतरत्र पाठवले जाते. मग याच तीन बहाद्दर माहाशयांना तात्काळ रुजू कसे केले गेले.....? हे खरंच मित्राच्या बायकोला हॉस्पिटलला भेटायला गेले होते का......?? ते हॉस्पिटल कोणते....? मित्र कोणता आणि रुग्णाचे नाव काय.....??? हे सारे गौडबंगाल अद्यापही गुलदस्त्यातच का....??? वरतून पोलिसांवरतीच गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जाते. पन्नास हजार रुपयांची लाच मागितली म्हणून आरोप केले जातात. जर का मग हे खरे होते तर ही तक्रार लाचलुचपत विभागाकडे त्या महाशय शिक्षकांनी का केली नाही....?? अप्पर






सचिव विजय चांदेकर व राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी या बाबींची खातरजमा का केली नाही.....??? हे सारं...... सारंकाही संस्था असल्याने आणि कक्षाधिकारी जयलाल राजपूत यांच्या मार्गदर्शनाने परिपक्व झालेले निगरगट्ट आर्सुळ आप्पा यांनी अगदी नाट्यमयरित्या हाताळलेल्या या प्रकरणात कार्यतत्पर-कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अजित पवार यांच्यासह विभागीय अप्पर आयुक्तांवर ही जि.प.तील दलालांची कुरघोडी नाही का......???? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे. या ठिकाणी डेपोटेशन वाट पदोन्नतीच्या जागेवर जाण्यासाठी कितीतरी चांगली मंडळी साल न साल ताटकळत वाट पाहत असताना कक्षाधिकारी आरसुळ यांनाच दोन-दोन विभागाचा कार्यभार कशासाठी....? तसेच प्रत्येक प्रकरणात दुसरे सामान्य प्रशासन विभागाचे कक्षाधिकारी जयलाल राजपूत यांच्या विरोधात सातत्याने शेकडो तक्रारी असतानाही त्यांना त्यांच्या मनासारखी जागा व मनासारखे निकाल कशासाठी...?? राजपूत-आर्सुळ आणि हे तीनही शिक्षक जि.प.चे व शासनाचे जावई आहेत का....?? या पाच पांडवांना वेगळा न्याय आणि जिल्ह्यातील ईतरांना वेगळा न्याय कशासाठी....का....?? हे सारे आता कुठेतरी थांबणे नितांत गरजेचे आहे सीईओ अजित पवार साहेब.....!! नाहीतर लवकरच जिल्ह्यातील सर्व सामान्य





मायबाप जनता व विविध सामाजिक संघटनांचा लवकरच उद्रेक होईल यांनी केवळ अशा लाडक्या जावयांचे लाड पुरवल्यापायी चालू असलेल्या अनागोंदी कारभारामुळे एक दिवस लवकरच जि.प.प्रशासनाविरोधात न्यायालयात दाद मागून वरतून आंदोलनरुपी एल्गार पुकारला जाईल तेंव्हा ईतर बांडगूळांच्या अगोदर तुम्ही अडचणीत याल हे लक्षात घ्या जरा......!!!
जि.प.सेवाशर्थी व नियम, शिस्त व आपील, या शासन निर्णयानुसार गैरशिस्त, गैरवर्तन, स्वतःच्या कर्तव्यात कसूर, गुन्हा नोंद होऊन सातत्याने वर्तमानपत्रातून बातमी येणे, या सर्व बाबींच्या अनुषंगाने निलंबित करण्याचा अधिकार सीईओ यांना थेट आहे. सदरील निलंबनानंतर पदस्थापना देण्याचाही अधिकार सीईओ यांनाच आहे. दोन्ही प्रकरणात सीईओ यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पडली आहे. परंतु मंत्रालय पातळीवर या शिक्षकांना शिक्षा न देता उलट त्यांना त्यांच्या मनावर रुजू करून घेणे. म्हणजे शिक्षण विभागातील शिस्तीला, नियमांना काहीच किंमत नाही. शिवाय एका राज्यमंत्र्याच्या व अप्पर सचिव विजय चांदेकरांच्या नजरेत एक आय.ए.एस. (IAS) अधिकाऱ्याच्या निर्णयास व त्या अधिकाऱ्याच्या अधिकारांची कवडीमोल किंमत असल्याचेही या जुगार प्रकरणाने प्रथमच दाखवून दिल्याने जिल्ह्यात सर्वत्र वेगळ्याच चर्चेला उधाण आलेले दिसून येत आहे.

गुन्हा नोंद असल्यानंतर जामीन जरी मिळाला तरी निर्दोष मुक्तता झाली असे थोडेच म्हणता येते.....??
मंत्रालय पातळीवरून तर न्यायालयाप्रमाणे न्यायप्रक्रिया तथा आदेश वापरून त्यांना त्यांच्यासमोर शाळेवर पदस्थापना दिली. परंतु वरतून त्यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्य कालावधी केला हे गौडबंगाल नेमके काय....?? गुन्हा नोंद असल्यावर शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत न्यायालयाचा निकाल येईपर्यंत गुन्हा घडलेल्या निलंबन कालावधीचे वेतन देता येत नाही. हे सुनावणी अधिकारी अरसुळ आप्पा यांनी का स्पष्ट केली नाही. हेही जनतेला कळणे नितांत गरजेचे आहे. या जि.प. मध्ये शुल्लक कारणांनी गुन्हा दाखल असलेल्या व पूर्वी निलंबित असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना मग याच निर्णयाचा तथा संधीचा लाभ मिळावा यासाठी विजय चांदेकर हे एक आगळावेगळा अफलातून शासन निर्णय काढतील का....?? म्हणजे राज्यभरातील सर्व सीईओ यांचे काम आणखीनच हलके होईल. सीईओ साहेब वर्तमानपत्र हे समाजाचा आरसा त्याचा चौथा स्तंभ आहे. तेंव्हा आपल्या जि.प. विषयी जवळपास गेल्या ९० दिवसांपासून सातत्याने लिखाण केले जात आहे. यापूर्वीही अनेकांनी केले आहे. साहेब गंभीरातील गंभीर अजामीन पत्र गुन्ह्यात अटक झाल्यानंतरही 90 दिवसानंतर संबंधित गुन्हेगारास जामीन मिळतो व तुमच्या जि.प.अंतर्गत दडलेले वरील नामे प्रमुख दोन ठक-बदमाश आणि त्यांच्या टोळीचा एवढा लाड कशासाठी.....का....?? आज ना उद्या आपण बदली होऊन जाल वा निवृत्त व्हाल. तेंव्हा आपण यांना का पाठीशी घालतायेत....का....? का यांना आपण घाबरताय.....?? त्यांचे हात फार वरपर्यंत आहेत का....??? हे सारे एकदा जिल्हाला उघडपणे सांगातरी.....! मग पुढचं बीड जिल्हावाशी बघतील. नाहीतर पर्याय नसल्याकारणे कारण नसताना यांचा सर्वांचा रोष आपणावर बेतल्याशिवाय राहणार नाही. हेही नक्कीच....!

**तेंव्हा आता कर्मशः भाग--४ शुक्रवारच्या अंकात वाचा पुढील सार.......!!!!!.**

# संशयाचे भूत डोक्यात शिरले : पतीने पत्नीला यमसदनी धाडले

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** परपुरुषासोबत पत्नीचे अनैतिक संबंध असल्याचा संशय पतीला आला. त्यामुळे पतीने गळा दाबून पत्नीची हत्या करुन यमसदनी धाडले. हि घटना आर्णी तालुक्यातील सुकळी येथे 31 जुलै रोजी रात्री घडली असून आज 1 ऑगस्ट रोजी उघडकीस आली. सविता विनोद कथलेवाड वय वर्ष २६ रा. सुकळी असे मृतकचे नाव आहे. तर विनोद चंद्रभान कथलेवाड वय वर्ष ३३ असे आरोपी पतीचे नाव आहे.
दिनांक ३१ जुलै ला रात्री १० च्या दरम्यान चारित्र्याच्या संशयावरून दोन्ही पती पत्निमध्ये वाद झाला. आरोपी पतीने मृतक पत्नीला जमिनीवर दोरीच्या साहाय्याने गळा आवळला त्यानंतर पलंगावर ठेऊन हाताने गळा आवळुन खून केला.



एवढेच नव्हे मृतदेहावर चादर टाकून रात्रभर आपल्या दोन मुलीसह घरातच झोपला. सकाळी ५ च्या सुमारास उठून आर्णी पोलिस स्टेशन गाठून हत्या केल्याची कबुली देत स्वतः ला आर्णी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. आर्णी पोलिस स्टेशनचे ठाणेदार पितांबर जाधव यांनी आपल्या पोलिस कर्मचाऱ्यांसह घटना स्थळ गाठून पंचनामा केला. मृतदेह शव विच्छेदन करिता पाठविला. उप विभागीय पोलिस अधिकारी आदित्य मिरखेलकर यांनी ही घटना स्थळी भेट दिली. पुढील तपास सुरू आहे.

# पैठण शहर व्यापारी महासंघाच्या मागणीला यश

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील कमान ते नाका रोडमधील गॅप पडलेला होता. यामध्ये मोटारसायकल अडकुन शेकडो अपघात झाले परंतु याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले असल्याने या रस्त्यावर मधला गॅप भरून काढावा यासाठीचा सतत पाठपुरावा मागील 1 वर्षांपासून पैठण शहर व्यापारी महासंघातर्फे करण्यात येत होता. खूप लोक या रस्त्यावर अपघातग्रस्त झाले होते. शहरातील कमान ते नाका रोडमधील दुभाजकामध्ये गॅप पडला होता. त्यामुळे असंख्य नागरिक, वृद्ध लोक सतत या रोडवर पडून अपघातग्रस्त होत होते व त्यामुळे हा गॅप भरून काढावा यासाठी सतत पैठण शहर व्यापारी महासंघ पाठपुरावा करत होता. मागील 7 दिवसांपूर्वी पैठणचे आ. संदीपान भुमरे यांच्याशी त्यासंबंधी परत एकदा चर्चा केली होती. त्यांनी लगेच यासंबधी संबंधित अधिकारी यांना या संबधी सूचना दिल्या. तदनंतर पैठण शहर व्यापारी महासंघाने सा.बा. विभागाचे



अभियंता बोरकर यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, पाऊस थांबला की मी ते काम पूर्ण करून घेतो आणि आज काम प्रत्यक्षात सुरू झालेले आहे. यामुळे पैठण तालुक्यातील नागरिक, व्यापारी यांनी समाधान व्यक्त केले आहे व पैठण शहर व्यापारी महासंघाचे अभिनंदन करत आहे.

# अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाचे अधिवेशन ठाण्यात

## राज्यपाल कोश्यारींची उपस्थिती; विविध पुरस्कारांचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन यावेळी येत्या आगष्ट महिन्यात ठाणे येथे आयोजित करण्यात आले असून या अधिवेशनात महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविससह राजकिय, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.
ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनात कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांसाठी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.
यात ज्या पत्रकारांनी आपल्या लेखणीतून समाजातील शेवटच्या निराधार व्यक्तींना न्याय मिळवुन देणे, शोध पत्रकारीता, शासनाच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांना प्रसिध्दी देऊन समाजाला सुविधा उपलब्ध करुन देण्यात सक्रिय सहकार्य केले अशा पत्रकारांना पत्रकार भुषण, उद्योगात ज्यांनी आपला ठसा उमटवला त्यांना उद्योग रत्न, कृषी क्षेत्रातील प्रगत शेतकऱ्याला कृषिरत्न, शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्यकरणाऱ्या शिक्षकाला शिक्षक रत्न, सामाजिक क्षेत्रात अपली छाप पाडणाऱ्यांना समाजभूषण, सांसदिय क्षेत्रात उत्कृष्ट सामाजिक प्रश्नांची सोडवणुक करणाऱ्या राजकारणातील सक्रिय लोकप्रतिनिधीला संसद रत्न आदी पुरस्कार देऊन महामहिम राज्यपालांचे हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील इच्छुकांनी आपल्या क्षेत्रातील केलेल्या कार्यांची लिखित माहीती आवश्यक कागदपत्रासह दिनांक 30 जुलै पर्यंत नमुद वाटसअँप नंबर किंवा नमुद पत्त्यावर फोटोसह पाठवावी. दिनांक एक ऑगस्ट रोजी निवड समितीने निवड केल्यानंतर दोन दिवसाच्या आत आपल्याला पत्र पाठवल्या जाईल अधिक माहितीसाठी 9082029266, 9421536755, 7304257377, 8351900595, 8655520819, 9152027708 तथा आनंद हिला तळमजला दगडी शाळेसमोर ठाणे पश्चिम 400602 येथे संपर्क साधण्याचे आवाहन ठाणे अधिवेशनाचे आयोजक पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी यांनी केले आहे.



# मुदतवाढ नाहीच !

आधुनिक केसरी

आयटीआर दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०२२ होती, ही मुदत आता संपली आहे. ३१ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत सुमारे साडेपाच कोटी लोकांनी आयटीआर भरले, परंतु बहुसंख्य लोकांनी अद्याप आयटीआर भरलेला नाही. त्यामुळे ज्यांनी आतापर्यंत आयटीआर भरले नाहीत, त्यांना आता आयकर रिटर्न भरण्यापूर्वी दंड भरावा लागेल, त्यानंतरच ते आयटीआर दाखल करू शकतील. सरकार शेवटच्या क्षणी आयटीआर दाखल करण्याची अंतिम मुदत वाढवेल, अशी शक्यता होती. परंतु सरकारने आधीच सूचित केल्याप्रमाणे, रिटर्न भरण्याची अंतिम तारीख वाढवली नाही. बहुसंख्य लोकांनी आणि वित्तीय संस्थांनी कर विवरणपत्र भरण्याची मुदत वाढवावी, अशी मागणी सरकारकडे केली होती. परंतु सरकारने मुदत वाढवली नाही. ऑनलाइन पद्धतीने आयटीआर दाखल करताना वेबसाइटमधील त्रुटींबद्दल अनेकांनी तक्रारी केल्या होत्या. तरीही सरकारने आयटीआर भरण्याची अंतिम मुदत वाढवून देण्यास स्पष्टपणे नकार दिला. जर तुम्हाला ३१ जुलै २०२२ पर्यंत आयटीआर दाखल करता आला नसेल, तर तुम्ही ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत आयकर कायद्याच्या कलम १३९ (४) नुसार विलंब शुल्कासह तुमचं विवरणपत्र भरू शकता. यासाठी तुम्हाला १००० ते ५००० रुपये दंड भरावा लागेल. तुमचे वार्षिक उत्पन्न जर पाच लाख रुपयांपेक्षा कमी असेल आणि तुम्ही अद्याप आयटीआर भरला नसेल, तर तुम्ही आजपासून ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत कधीही १ हजार रुपये दंड भरून तुमचा ITR दाखल करू शकता. तथापि, तुमचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असल्यास, तुम्हाला दंड म्हणून एक रुपयाही भरण्याची आवश्यकता नाही. जर एखाद्या व्यक्तीचं वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांपेक्षा जास्त असेल आणि त्याने अद्याप आयटीआर दाखल केला नसेल, तर त्यांना आयटीआर दाखल करण्यासाठी पाच हजार रुपयांपर्यंत विलंब शुल्क भरावा लागणार आहे. याशिवाय थकित करावर व्याजदेखील द्यावे लागणार आहे. थकित करावरील व्याज १ ऑगस्टपासून () सुरू झाले. आयकर विभागाच्या कलम १३९ (१) नुसार आयटीआर वेळेवर भरला नाही, तर त्यांना आयटीआर भरताना थकित कर देयकावर दरमहा १ टक्के दराने व्याज द्यावे लागते. तुम्ही ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत विलंब शुल्कासह आयटीआर भरला नाही, तरीही तुम्हाला रिफंड मिळू शकतो. पण त्यासाठी तुम्हाला खूप किचकट प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. परतावा मिळवण्यासाठी तुम्हाला तुमच्या क्षेत्राच्या आयकर आयुक्तांकडे अपील करावे लागेल. तुमचे आयटीआर न भरण्याचे कारण योग्य असल्यास आयकर आयुक्त तुम्हाला आयटीआर भरण्याची परवानगी देऊ शकतात. त्यानंतर तुम्हाला परतावा मिळू शकतो.

# कट्टरवाद्यांना रोखणे आवश्यक




अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**काही कट्टरवादी शक्ती मुद्दाम देशांमध्ये अराजक पसरविण्यासाठी अशा पद्धतीचे हत्या सत्र करीत आहेत. पॉपुलर फ्रंट ऑफ इंडिया सारख्या कट्टरवादी आणि दहशतवादी विचारांच्या संघटनेवर सरकारने ताबडतोब बंदी घातली पाहिजे. परंतु एका संघटनेवर बंदी घातल्याने काम संपत नाही. दुसऱ्या नावाने तेच लोक पुन्हा नवीन संस्था स्थापन करतात. त्यामुळे जुन्या संस्थेचे संस्थापक कोण होते, त्यांचे अनुयायी कोण होते, हे हुडकून काढून नवीन संस्था जर त्याच पद्धतीच्या लोकांद्वारे रजिस्टर केली जात असेल तर त्याला अनुमती मिळू नये याची व्यवस्था केल्या गेली पाहिजे.**

नुकतीच कर्नाटकमध्ये दक्षिण कन्नड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते प्रवीण नेट्टारु यांची हत्या करण्यात आलेली आहे. बजरंग दल कार्यकर्ता हर्ष यांचीही काही महिन्यांपूर्वी कर्नाटकमध्ये हत्या करण्यात आलेली होती. प्रवीण यांच्या हत्येमध्ये आतापर्यंत ज्या लोकांना अटक करण्यात आलेली आहे ते सर्व पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संस्थेचे कार्यकर्ते आहेत. ही मुस्लिम कट्टरवादी संघटना आहे. देशामध्ये विविध प्रांतांमध्ये मुस्लिम लोकांना भडकविणे, त्याचे रूपांतर दंगे, जाळपोळ यामध्ये करणे, यामध्ये पीएफआयचा प्रामुख्याने सहभाग आहे. काही वर्षांपूर्वी पीएफआयच्या जागी आपण 'सीमी'चे नाव वाचत होतो. एका संघटनेवर बंदी घातली की दुसरी संघटना उदयास येते व कट्टरवाद्यांचे मनसुबे पूर्ण करीत राहते. ज्या कट्टरवादी मानसिकतेतून देशाचे दोन तुकडे झाले व पाकिस्तान जन्माला आला तीच मानसिकता आजही जिवंत आहे हे आपल्याला सीमी, जमाती इस्लामी किंवा पीएफआयच्या कारवायांवरून लक्षात येते. देशातील शांतिप्रिय जनते करता हे सर्व धक्कादायक आहे. देश प्रगतीपथावर चाललेला असताना देशामध्ये हिंदू-मुसलमान असे ध्रुवीकरण करायचे आणि देशातील वातावरण खराब करायचे अशा पद्धतीचा या संघटनांचा मनसूबा आहे. रस्त्यावरील अपघातामध्ये जशी चूक एखाद्या मोटरसायकलस्वाराची असली तरीसुद्धा दोष कारचा किंवा मोठ्या वाहनाचा धरला जातो. त्याच पद्धतीने देशामध्ये दंगे धोपे झाले, जाळपोळ झाली, तर स्वाभाविक करणारे लोक हेच असल्यामुळे अटकेत हेच जातात. प्रवीण नेट्टारुच्या हत्ते मध्येही आतापर्यंतच्या 21 लोकांना पकडले गेलेले आहे. त्यामध्ये सर्वच पीएफआयशी संबंधित कार्यकर्ते आहेत. परंतु या धार्मिक कट्टरतावादाला जर हिंदूंकडून उत्तर दिल्या गेले तर मात्र या देशात अल्पसंख्य असुरक्षित आहेत अशी बोंब केल्या जाते. जगामध्ये प्रसारित धार्मिक स्वतंत्रता अहवालामध्येसुद्धा भारतामध्ये अल्पसंख्यक समाज कसा असुरक्षित आहे हेच दाखविले जाते. यावरून आपल्या लक्षात असे येते की येथील बहुसंख्य समाजाचे जीवन धोक्यात घालणे, दंगे, जाळपोळीच्या माध्यमातून येथे असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणे व याच्या विरोधात पोलिसांनी किंवा सामान्य समाजाने कारवाई केल्यास अल्पसंख्यक सुरक्षित नाही अशा पद्धतीचा कांगावा करणे. असे एकंदरीत नाटक देशांमध्ये सुरू आहे.

पीएफआय या संघटनेतर्फे देशांमध्ये "सेव्ह रिपब्लिक" नावाचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. सेव्ह रिपब्लिक म्हणजे प्रजातंत्र वाचवा. परंतु प्रजातंत्र धोक्यात कोणामुळे आहे हा प्रश्न विचारला गेला पाहिजे. कन्हैयालालची हत्या जेव्हा होते तेव्हा प्रजातंत्र धोक्यामध्ये येते. उमेश कोल्हेची हत्या ज्या वेळेला अमरावतीमध्ये होते त्यावेळेस सुद्धा प्रजातंत्र धोक्यामध्ये येते. आणि बजरंग दल कार्यकर्ता हर्ष असो वा भाजयुमो कार्यकर्ता प्रवीण असो, यांच्या पण हत्या ज्या वेळेला कट्टरतावाद्यांकडून केल्या जातात त्यावेळेला प्रजातंत्र धोक्यात येते. मग आता प्रजातंत्र धोक्यात आणणारे सेव रिपब्लिक अशा पद्धतीचा कार्यक्रम जर करू लागले तर देशातील सुज्ञ जनतेला हसावे की रडावे हेच कळणार नाही. यालाच चोराच्या उलटया बोंबा म्हणतात. म्हणजे देशात आपणच प्रजातंत्र धोक्यात आणायचे आणि वर आपणच सेव रिपब्लिक असे कार्यक्रम घ्यायचे. ते तरी बरे आहे की दिल्लीमध्ये या सेव रिपब्लिक कार्यक्रमाच्या अंतर्गत होणाऱ्या रॅलीला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. एकीकडे पीएफआयसारख्या संघटनांचा भारत विरोधी, देश विरोधी व हिंदू विरोधी कार्यक्रम सुरू असताना देशात दुसरीकडे मुस्लिम राष्ट्रीय विचार मंचाचे अधिवेशनसुद्धा पार पडलेले आहे. या अधिवेशनामध्ये जवळपास 800 विविध प्रांतातील मुस्लिम प्रतिनिधींनी आपली हजेरी लावलेली होती. यामध्ये प्रामुख्याने जे काही विचार मंथन झाले त्यामध्ये देशांमध्ये चालणाऱ्या विविध घडामोडींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने येथील सध्याचा मुस्लिम समाज हा याच देशातील राहणारा आहे. यांचे पूर्वज हिंदूच होते, यांची संस्कृती ही हिंदू संस्कृतीच आहे अशा पद्धतीचा भाव या अधिवेशनात विविध मुस्लिम वक्त्यांद्वारे व्यक्त करण्यात आलेला आहे. सर तन से जुदा या घोषणेला विविध मुस्लिम वक्त्यांद्वारे विरोध दर्शविलेला आहे.




नुकतीच दिल्लीमध्ये आंतरधर्मीय समरसता परिषद झाली. त्यामध्ये विविध सुफी धर्मगुरूंनी तसेच हजरत सईद नसिरुद्दीन चिस्ती यांनी सुद्धा सर तन से जुदा या घोषणेला विरोध केलेला आहे . या परिषदेला संबोधित करताना राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित ढोबाल यांनी सुद्धा म्हटले आहे की काही लोक धर्माच्या नावावर देशाला तोडण्याचे षडयंत्र करीत आहेत. आणि वास्तविकता हीच आहे की देशातील करोडो लोक आपल्या रोजच्या कामधंद्यामध्ये व्यस्त असताना त्यांना अशा पद्धतीच्या धार्मिक कट्टरता वादाची बिलकुल आवश्यकता नाही. काही कट्टरवादी शक्ती मुद्दाम देशांमध्ये अराजक पसरविण्यासाठी अशा पद्धतीचे हत्या सत्र करीत आहेत. पॉपुलर फ्रंट ऑफ इंडिया सारख्या कट्टरवादी आणि दहशतवादी विचारांच्या संघटनेवर सरकारने ताबडतोब बंदी घातली पाहिजे. परंतु एका संघटनेवर बंदी घातल्याने काम संपत नाही. दुसऱ्या नावाने तेच लोक पुन्हा नवीन संस्था स्थापन करतात. त्यामुळे जुन्या संस्थेचे संस्थापक कोण होते, त्यांचे अनुयायी कोण होते, हे हुडकून काढून नवीन संस्था जर त्याच पद्धतीच्या लोकांद्वारे रजिस्टर केली जात असेल तर त्याला अनुमती मिळू नये याची व्यवस्था केल्या गेली पाहिजे. देशामध्ये कुठेही घडलेली हत्या जर कट्टरवादी शक्तींनी केलेली असेल तर मात्र देशातील समस्त हिंदू समाजाने सावध आणि संघटित होण्याची आवश्यकता असते. देशामधील शांततेसाठी सुद्धा हिंदू समाज जबाबदार आहे. देशामध्ये हिंदूंची एवढी प्रभावी संघटना असायला पाहिजे की अशा थातूरमातूर संघटना आणि त्यांचे अनुयायी यांना देशांमध्ये दहशतवाद पसरविण्याची हिंमतच होता कामा नये. भारतालाच नव्हे तर जगाला सुद्धा या कट्टरवादी शक्तीचा धोका आहे. सामाजिकरीत्या सक्रिय लोकांनीसुद्धा सावध राहण्याची आवश्यकता आहे. अशा पद्धतीच्या धमक्या, फोन कोणालाही मिळाल्यास त्यांनी पोलीस तसे सामाजिक संघटना यांना कळवून स्वतः व इतरांना सावध करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश आता समोर जात आहे. अशा परिस्थितीत देशविरोधी शक्ती देशाला विस्कळीत करण्यासाठी धार्मिक उन्मादाच्या नावाखाली काही माथेफिरू लोकांना एकत्र करून त्यांच्याद्वारे दहशतवाद माजविण्याची योजना करीत असले तर नवल नाही. परंतु अशा योजना हाणून पाडण्यासाठी सर्व धर्मातील शांती प्रेमी लोकांनी एकत्र येण्याची व देशांमध्ये आपला दबाव व प्रभाव गट निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

# भगतसिंग कोश्यारी : राज्यपाल की मराठी माणसाचे वैरी!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मुंबईला जो आर्थिक राजधानीचा दर्जा प्राप्त झालेला आहे तो फक्त मराठी माणसांमुळेच. कारण अनेक पिढ्यांपासुन मुंबई ही मराठी माणसाचीच रहाली आहे. कोश्यारी यांनी गुजराती-राजस्थानी मासाचे कोणत्याही प्रकारचे कौतुक केले नसून उलट त्याचे नाव घेऊन मराठी माणसाला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यपाल महोदय आपणाला महाराष्ट्राचा इतिहास माहीती नसेल तर महाराष्ट्रातील लहान-मोठ्या मुलांना विचारा ते तुम्हाला ज्ञान देतील. परंतु मराठी माणसाच्या विरूद्ध अवाजवी वक्तव्य करून मीठ चोळण्याचे काम करू नका.**

राज्यपाल भगतसिंग कोशियारी यांनी गुजराती-राजस्थानीविरूद्ध मराठी असा वाद निर्माण करून कटुता निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना राज्यपाल पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. कारण कोश्यारी यांनी राज्या-राज्याच्या लोकांमध्ये वैरत्व निर्माण करण्याचे काम केले आहे. यामुळे मराठी माणसाला मोठी ठेस पोहचली आहे. त्याचबरोबर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी मराठी माणसाचा घोर अपमानसुध्दा केला आहे. कोशियारी यांना कदाचित मराठी माणसाचा व महाराष्ट्राच्या इतिहासाचा पूर्णपणे अभ्यास नसावा. त्यामुळेच ते म्हणतात "गुजराती -राजस्थानी लोक गेल्यास मुंबई आर्थिक राजधानी रहाणार नाही" अशा प्रकारे वक्तव्य करून भगतसिंग कोशियारी यांनी सरळ मराठी माणुस विरूद्ध गुजराती-राजस्थानी असा घनाघाती वार करून नवीन वाद निर्माण केला आहे व समाजामध्ये नवीन आग लावल्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. राज्यपालांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रातील मराठी माणसाला ते कमजोर समजतात. राज्यपालांचे उदगार अत्यंत निंदनीय असून त्यांच्यावर माननीय राष्ट्रपती महोदयांनी योग्य ती कारवाई करायला हवी. कारण राज्यपालांनी जाहीर कार्यक्रमात महाराष्ट्राच्या 12 कोटी 94 लाख लोकांचा घोर अपमान केला आहे. त्यामुळे भगतसिंग कोशियारी यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून राहण्याचा मान सुध्दा गमावलेला आहे. त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. आता महाराष्ट्राला खरोखरच मराठी राज्यपालांची गरज आहे. राज्यपालांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते की ते कट्टर मराठी माणसाच्या विरूद्ध आहेत. यदाकदाचीत राज्यपालांना महाराष्ट्राचा व मराठी माणसाचा इतिहास माहीत असता तर असे बोचरे वक्तव्य त्यांनी केलेच नसते. मराठी माणूस हा मनमीळावु वृत्तीचा असल्यामुळे सर्वांनाच घेऊन चालतो.त्यामुळेच इतर राज्यातील लोकांना महाराष्ट्रात रोजगार प्राप्त झालेला आहे, ही बाब राज्यपाल महोदयांनी विसरू नये. मराठी माणूस हा आपली माणुसकी नेहमीच जपत असतो. त्यामुळेच भारतातील काण्याकोपऱ्यातील व्यक्ती महाराष्ट्रात दिसतो. याचा अर्थ असा नाही की मराठी माणूस कमजोर आहे. याचे भान भगतसिंग कोशियारी यांनी ठेवले पाहिजे. राज्यपालांनी लक्षात ठेवले पाहिजे की इतर राज्यांतील लोकांना महाराष्ट्रात जो मान सन्मान मिळतो तो फक्त मराठी माणसामुळेच. मुंबई भारताची आर्थिक राजधानी आहे आणि राहील. मुंबईला जो आर्थिक राजधानीचा दर्जा प्राप्त झालेला आहे तो फक्त मराठी माणसांमुळेच. कारण अनेक पिढ्यांपासुन मुंबई ही मराठी माणसाचीच रहाली आहे. कोशियारी यांनी गुजराती-राजस्थानी मासाचे कोणत्याही प्रकारचे कौतुक केले नसून उलट त्याचे नाव घेऊन मराठी माणसाला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे.राज्यपाल महोदय आपणाला महाराष्ट्राचा इतिहास माहीती नसेल तर महाराष्ट्रातील लहान-मोठ्या मुलांना विचारा ते तुम्हाला ज्ञान देतील. परंतु मराठी माणसाच्या विरूद्ध अवाजवी वक्तव्य



करून मीठ चोळण्याचे काम करू नका. आज तुम्ही ज्या राज्यपाल पदाच्या खुर्चीवर बसून आहात ती महाराष्ट्राची अस्मिता आहे इतर राज्यांची नाही. त्यामुळे ज्या राज्याचे आपण राज्यपाल आहात त्या राज्याचा मानसन्मान जपायला हवा. आपण गुजराती-राजस्थानी शब्दाचा वापर करून संपूर्ण महाराष्ट्रात व्देष भावना निर्माण करून समाजात आग लावण्याचा प्रयत्न करीत असाल तर ही बाब राज्यपाल या पदाला कलंकित करणारी आहे. राज्यपाल हे पद प्रतीष्ठेच व सन्मानच पद आहे.परंतु आपल्या विवादास्पद वक्तव्यामुळे दिवसेंदिवस या पदाला आपण मलीन करण्याचे काम करीत आहात ही बाब आज महाराष्ट्रातील जनतेच्या पूर्णपणे लक्षात आली आहे. आपली जीभ वारंवार घसरते याचाच अर्थ आपण वारंवार राज्यपाल पदाचा अपमान करीत असतात. आपण राज्यपाल पदाला कलंकित करून बदनाम करण्याचे काम केले आहे. त्यामुळे राज्यपाल महोदय आपणाला पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही असे मला वाटते. राज्यपाल म्हणतात की नेहमीप्रमाणे माझ्या विधानाचा विपर्यास होतो, एका समाजाचे कौतुक म्हणजे दुसऱ्याचा अपमान नव्हे असे ते म्हणतात. राज्यपाल महोदय कौतुक करण्यासाठी अनेक शब्द व वाक्प्रचार आहेत. परंतु आपण नेहमीच मराठी माणसाला डीवचणारे शब्द वापरता त्यामुळेच अशी परिस्थिती उदभवत आहे. गुजराती -राजस्थानी मुंबईतुन गेल्यास मुंबई आर्थिक राजधानी रहाणार नाही असे राज्यपाल म्हणतात. राज्यपाल महोदय गुजराती -राजस्थानी माणसांना मराठी माणसानी रोखले का? प्रत्येकांना भारतात कुठेही रहाण्याचा अधिक आहे त्याच पध्तीने मुंबईत गुजराती -राजस्थानी रहातात यात नवल काय? ते गेल्याने मुंबई आर्थिक राजधानी रहाणार नाही हे तुम्हाला कोणी सांगितले? कोणत्याही समाजाचा व्यक्ती असो तो ज्या ठिकाणी रहातो म्हणून ते शहर आर्थिक राजधानी होते असं नसते. राज्यपाल महोदय, मुंबई ही आर्थिक राजधानी मराठी माणसानी आपल्या कष्टांनी, मेहनतीने आणि कर्तृत्वाच्या बळावर तयार केली आहे. राज्यपाल महोदयांनी कोणत्याही समाजाचे कौतुक केले नसून सर्वांचाच अपमान केला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विकासाचे मापदंड आणि आव्हाने



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी दोन दशकांपूर्वी 'व्हिजन 2020' ची संकल्पना समोर ठेवून भारताचा विकास करण्याचे स्वप्न पाहिले होते. एका सेट संकल्पनेत ते एक शक्तिशाली स्वरूप होते. 2022 मध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, दोन कोटी घरे देणे ही सर्व आश्वासने आणि हेतू सध्याच्या सरकारचे विकासाचे मॉडेल आहेत. यशाचा दर कुठे आहे आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून विकासाचे मॉडेल किती चांगले सिद्ध होत आहे, हा तपासाचा विषय आहे. सरकारे येतात आणि जातात, पण नागरी हक्क आणि सुसह्य जीवनाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या लोकांना स्वप्ने दाखवली जातात,पण जेव्हा ती साकार होत नाही तेव्हा ते निराश होतात.**

भारताची पहिली पंचवार्षिक योजना 1951 मध्ये सुरू झाली, ती प्रामुख्याने कृषी क्षेत्राशी संबंधित चालविली गेली, ज्यात धरणे आणि सिंचनातील गुंतवणूक समाविष्ट होती. त्यानंतर 1952 च्या सामुदायिक विकास कार्यक्रमाने गावांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले गेले. 26 जानेवारी 1950 रोजी राज्यघटना लागू झाल्यानंतर देशाच्या विकासाची ही दोन मॉडेल्स आपल्यासमोर होती, जिथून भारताला वेगाने पावले टाकावी लागणार होती. मात्र, वर्षभरातच सामुदायिक विकास कार्यक्रम फसला.या अपयशानंतर पंचायती राज व्यवस्थेचे स्वरूप समोर आले, जे सध्याच्या काळातील लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भात विकासाचे प्रमुख स्वरूप आहे. 2015 मध्ये 12 व्या पंचवार्षिक योजनेत ते रद्द करण्यात आले. 1 जानेवारी 2015 पासून नीती आयोगाची स्थापना वैचारिक संस्था म्हणून पुढे आली.

वरीलपैकी काही संदर्भांवरून असे दिसून येते की, देशात कमी-अधिक प्रमाणात विकासाचे मॉडेल कायम राहिले आहे. पण 1991 च्या उदारीकरणानंतर ही संकल्पना नव्या अर्थाने देशात विस्तारली. हा तो काळ होता जेव्हा जग सुशासन स्वीकारत होते. याच काळात जागतिक बँकेने तयार केलेली सुशासनाची आर्थिक व्याख्या 1992 मध्येही दिसून आली. ते स्वीकारणारा ब्रिटन हा पहिला देश होता. गेल्या तीन दशकांत देशात आणि राज्यात अनेक विकासाचे मापदंड पाहायला मिळतात. सुशासनाची पटकथाही या तीन दशकांत विस्तारली. 2014 मधील सोळाव्या लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान राज्यांमधील विकासाचे उत्साही आणि दोलायमान रूप सर्वांच्याच जिभेवर होते. बिहारचे विकास मॉडेलही बोर्डावर आले, ज्यामध्ये बिहारची शांतता, कायदा आणि सुव्यवस्था आणि सर्वसमावेशक संरचनेत मूलभूत बदलाचा दावा होता.

सध्या उत्तर प्रदेश सेवा, सुरक्षा आणि सुशासन यांना समर्पित एक नवीन मापदंड तयार करत आहे. दिल्ली हा एक केंद्रशासित प्रदेश आणि अधिराज्य आहे जिथले सरकार शिक्षणाच्या शक्तिशाली स्वरूपाने भारावलेले दिसते. रस्त्यांचे जाळे, सामाजिक सुरक्षा, पर्यटन आणि अर्थव्यवस्थेवर भर देण्याच्या दृष्टीने डोंगराळ प्रदेशांसाठी हिमाचलचे विकास मॉडेल उदाहरण म्हणून दिले जात आहे. 2000 साली स्थापन झालेल्या तीन राज्यांमध्ये बेरोजगारीचा दर 0.6 टक्क्यांच्या खालच्या पातळीवर आणल्यामुळे विकासाचे उत्तम उदाहरण म्हणून छत्तीसगडकडे पाहिले जात आहे. त्याच धर्तीवर, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, गोवा आणि महाराष्ट्र या दक्षिणेकडील राज्यांसह अनेक राज्यांनी सर्वसमावेशक संकल्पनेअंतर्गत त्यांचे संबंधित स्वरूप सर्वोत्कृष्ट स्वरूपात सादर करण्याचा संदर्भ दिला आहे.

तथापि, उत्तराखंड आणि ईशान्येकडील अनेक राज्ये आहेत, ज्यांचा विकास पॅटर्न आतापर्यंत दिसून आलेला नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की कृषी आणि संबंधित क्षेत्रे, वाणिज्य आणि उद्योग, मानव संसाधन विकास, आर्थिक प्रशासन, समाजकल्याण, पर्यावरण आणि नागरिक केंद्रित प्रशासन ही अशी काही उदाहरणे आहेत जी केवळ विकासाचे मापदंड ठरवण्यातच मदत करत नाहीत, तर राज्यांचा शासन निर्देशांक राज्यांना नवीन उंची देणारा आहे. विकास ही लोकांच्या प्रगतीला चालना देणारी योजना आहे, जेणेकरून मानवाचे जीवनमान सुधारेल.

त्याला विकसित आणि अंमलबजावणी करताना, सरकार लोकसंख्येची आर्थिक आणि कामगार परिस्थिती सुधारण्यासाठी, आरोग्य आणि शिक्षणाच्या प्रवेशाची हमी देण्यासाठी आणि इतर समस्यांसह संरक्षण प्रदान करण्यासाठी कार्य करते. विशेष म्हणजे, विकास मॉडेलचे यश अनेक घटकांवर अवलंबून असते. सुशासनाचा विकास मॉडेलशी जवळचा संबंध आहे. त्याच्या केंद्रस्थानी लोकांचे सक्षमीकरण आहे. तसे पाहिले तर विकास हा एक प्रकारचा बदल आहे जो लोकांशी संबंधित आहे. जेव्हा हा विकास अधिक चांगला टप्पा घेतो तेव्हा अपेक्षित परिणाम अनेक मूलभूत संदर्भ जसे की गरिबी, रोगराई, बेरोजगारी, शेतकरी कल्याण, कायदा आणि सुव्यवस्था, आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा, शिक्षण, शहर तसेच ग्रामीण विकास,महिलांची सुरक्षा यासारख्या अनेक मूलभूत संदर्भांमध्ये अपेक्षित परिणाम पुन्हा पुन्हा मिळतात. हाच विकास मॉडेल म्हणून प्रस्थापित झाला आहे. विकासाला गती देण्यासाठी चांगले सरकार आणि उत्तम प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे. पारदर्शक व्यवस्था, लोकसहभाग, सत्तेचे विकेंद्रीकरण, उत्तरदायित्व, कायद्याचे राज्य आणि संवेदनशीलतेसह लोककल्याणाचा अंतर्निहित दृष्टीकोन सुशासनाची संकल्पना मजबूत करते. विकास आणि सुशासन हे एकमेकांना पूरक असल्याचे स्पष्ट झाले आहे. एक मजबूत विकास मॉडेल सुशासनाला बळ देऊ शकते आणि मजबूत प्रशासन मजबूत आणि शाश्वत विकासाला स्थैर्य प्रदान करू शकते. या दोन्ही परिस्थितींमध्ये, सार्वजनिक चिंता अंतर्भूत आहे आणि हा देश किंवा राज्याचा हेतू देखील आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर एक मजबूत विकास मॉडेल शोधण्याचे मोठे आव्हान होते. पन्नासच्या दशकात वसाहतवादापासून मुक्त झालेल्या आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील सर्व देश मूलभूत विकासासाठी जागतिक बँकेने पुरविलेल्या आर्थिक सुविधांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करू शकले नाहीत, त्यामुळे विकासाचे स्वरूप कसे असावे,याची चिंता निर्माण झाली होती.खरे तर हे सर्व देश ज्या देशांचे गुलाम होते त्याच देशांची कॉपी करत होते. हे पाहता, तौलनिक सार्वजनिक प्रशासनाच्या अंतर्गत अभ्यासाची प्रथा 1952 मध्ये आली आणि बरोबर दोन वर्षांनी 1954 मध्ये, विकास प्रशासनाची संकल्पना देखील भारतीय नागरी सेवक यू एल गोस्वामी यांनी मांडली. अंगभूत बाजू अशी आहे की प्रत्येक देशाचे स्वतःचे असे पर्यावरणशास्त्र असते, अशा प्रकारे सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक संकल्पना समजून न घेता विकासासाठी धोरणे तयार केली गेली, तर समस्या कायम राहण्याची शक्यता असते आणि अर्थव्यवस्थाही धोक्यात येण्याची शक्यता असते.जगातील असे सर्व देश औद्योगिकीकरण, शहरीकरण, संसाधनांचे जोरदार शोषण आणि सतत विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे विकासाचे प्रमुख साधन मानतात. तर भारतासारख्या देशासाठी चांगला विकास हाच आहे की,ज्याचा अवलंब गरिबी, रोग, बेरोजगारी, शिक्षण, औषध यासारख्या प्रचलित समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी, संघराज्य मजबूत करण्यासाठी आणि महिला सक्षमीकरण आणि सुरक्षा मजबूत करण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी केला जाऊ शकतो.मात्र, भारत आता नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून डिजिटल ओळख, वित्तीय प्रौद्योगिकी क्रांती यासह अनेक बाबतीत झेप घेत आहे. तसे पाहिल्यास, विकास मॉडेल हे केवळ विषयाचे कॉन्फिगरेशन नाही, तर वाढत्या समस्येच्या प्रमाणात कालांतराने विकसित केलेले एक साधन आहे, जे मजबूत सुशासनाने सुसज्ज करणे आणि सार्वजनिक चिंता वाढवणे शक्य आहे.

माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी दोन दशकांपूर्वी 'व्हिजन 2020' ची संकल्पना समोर ठेवून भारताचा विकास करण्याचे स्वप्न पाहिले होते. एका सेट संकल्पनेत ते एक शक्तिशाली स्वरूप होते. 2022 मध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, दोन कोटी घरे देणे ही सर्व आश्वासने आणि हेतू सध्याच्या सरकारचे विकासाचे मॉडेल आहेत. यशाचा दर कुठे आहे आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून विकासाचे मॉडेल किती चांगले सिद्ध होत आहे, हा तपासाचा विषय आहे. सरकारे येतात आणि जातात, पण नागरी हक्क आणि सुसह्य जीवनाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या लोकांना स्वप्ने दाखवली जातात,पण जेव्हा ती साकार होत नाही तेव्हा ते निराश होतात. नागरिकांची सनद (1997), माहितीचा अधिकार (2005), ई-गव्हर्नन्स चळवळ (2006), शिक्षणाचा अधिकार (2009), अन्न सुरक्षा (2013) इत्यादींसह राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 इत्यादी वेगवेगळ्या काळातील विविध विकास मॉडेल्सच आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार देशातील प्रत्येक चौथा व्यक्ती निरक्षर आहे. कमी-अधिक प्रमाणात गरिबीचा आकडाही तसाच आहे. अशा परिस्थितीत, सर्वसमावेशक चौकट, ग्रामीण उन्नती, शहरी विकास आणि संदर्भ मापदंडांमध्ये लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण केल्याशिवाय विकासाचा नमुना केवळ अपूर्णच राहणार नाही तर सुशासनालाही धक्का पोहोचेल.

# भारतीय नागरिकत्व सोडणाऱ्यांच्या संख्येत वाढ



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**गृह मंत्रालयाने २०२१ मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार १,६३,३७० लोकांनी आपल्या भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला. संसदेत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये म्हटलं की, या लोकांनी त्यांच्या 'वैयक्तिक कारणांमुळे' नागरिकत्व सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी अमेरिकेचं नागरिकत्व मिळवण्यासाठी सर्वाधिक म्हणजे ७८,२८४ लोकांनी भारतीय नागरिकत्व सोडले. या खालोखाल २३,५३३ लोकांनी ऑस्ट्रेलियाच्या तर २१,५९७ लोकांनी कॅनडाच्या नागरिकत्वासाठी भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला. चीन आणि पाकिस्तानसाठीही भारतीय नागरिकांनी आपल्या भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला. ३०० लोकांनी चीनचं तर ४१ लोकांनी पाकिस्तानचं नागरिकत्व स्वीकारलं.**

गेल्या दोन वर्षांत भारतीय नागरिकत्व सोडणा-या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. २०२० साली ८५,२५६ लोकांनी भारतीय नागरिकत्व सोडले होते, तर २०१९ साली १,४४,०१७ लोकांनी भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला होता. गेल्या पाच वर्षांत जवळपास ८ लाख लोकांनी भारतीय नागरिकत्व सोडले. परराष्ट्र धोरणांचे तज्ञ हर्ष पंत यांनी सांगितले की, २०२१ मध्ये भारतीय नागरिकत्व सोडणा-या लोकांची संख्या एकदम वाढली. याचं कारण हेही असू शकतं की कोरोना काळात लोकांच्या नागरिकत्व मिळवण्याच्या प्रक्रियेत अडथळा आलेला असू शकतो." पण एवढ्या मोठ्या संख्येने भारतीय आपले नागरिकत्व का सोडत आहेत? याबद्दल देशाबाहेर राहणा-या लोकांशी, देश सोडू पाहणा-या लोकांशी आणि तज्ञांशी चर्चा करण्यात आली.

परदेशात राहण्याचे अनेक फायदे दिसून आले. अमेरिकेत राहणारी एक महिला म्हणतात की, जर भारताला आपल्या लोकांना देश सोडण्यापासून थांबवायचं असेल किंवा ब्रेन ड्रेनवर नियंत्रण मिळवायचं असेल तर नवीन पावलं उचलावी लागतील. देशातल्या लोकांना उत्तम सुविधा देण्यासोबतच दुहेरी नागरिकत्व देण्यासंबंधी विचार करायला हवा, असं त्यांना वाटतं.

ती महिला २००३ साली नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत गेल्या होत्या. तिथलं वातावरण त्यांना आवडलं म्हणून त्यांनी तिथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मुलीचा जन्म तिथेच झाला. मग त्यांनी ग्रीन कार्डसाठी अर्ज केला आणि काही वर्षांनी त्यांना तिथलं नागरिकत्व मिळालं. त्या म्हणतात, "इथलं आयुष्य खूपच सोपं आहे. स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग खूपच चांगलं आहे. मुलांचं शिक्षण व्यवस्थित होतं. त्यांना इथे भारताच्या तुलनेत अधिक चांगल्या संधी मिळतील." "त्याशिवाय काम करण्याचं वातावरणही खूपच चांगलं आहे. तुम्ही जितकं काम करता त्या तुलनेत तुम्हाला चांगले पैसे मिळतात."

कामाच्या ठिकाणचं वातावरण उत्तम आहे. कॅनडात राहणा-या अभिनव आनंद यांचंही मत असंच काहीसं आहे. त्यांनी तिथूनच आपलं शिक्षण पूर्ण केलं आणि आता तिथेच नोकरी करत आहेत. ते सध्या भारतीय पासपोर्टच वापरतात, पण त्यांना भारतीय नागरिकत्व सोडण्याची इच्छा आहे. त्यांना वाटतं की कॅनडात काम करण्यासाठी चांगलं वातावरण मिळतं आणि त्यामुळे त्यांना भारतात परत जाण्याची इच्छा नाही. ते म्हणतात, "इथे काम करण्याचे तास निश्चित आहेत. कामाच्या ठिकाणी



नियम आणि कायदे पाळले जातात. तुम्ही जितकं काम कराल त्या हिशोबाने तुम्हाला पैसे मिळतात. भारतात हे नियम चांगल्या प्रकारे पाळले जात नाहीत. त्यामुळे मला नोकरीसाठी भारतात परत जायचं नाही आणि जर मी दुस-या देशात नोकरी करत असेन तर तिथलं नागरिकत्व घ्यायला काय हरकत आहे?"

हर्ष पंत म्हणतात की, बहुतांश लोक चांगलं आयुष्य, जास्त पैसे आणि संधींच्या शोधात देश सोडून जातात. ते म्हणतात, "मोठ्या देशांमध्ये चांगल्या सोयीसुविधा मिळतात, पण अनेक लोक लहान लहान देशांतही जातात. लहान देश व्यापारासाठी अनेक सवलती देतात. अनेक लोकांची कुटुंब अशाच देशात राहत असतात मग, ते लोकही तिथेच स्थायिक होतात."

भावनिक गुंतवणूक आहे, पण फायदे नाहीत. हरेंद्रल मिश्रा वरिष्ठ पत्रकार आहेत आणि गेल्या २२ वर्षांपासून इस्रायलमध्ये राहत आहेत. त्यांचं म्हणणं आहे की, भारताशी त्यांची नाळ जोडली गेली आहे. त्यामुळे ते भारतीय नागरिकत्वाचा त्याग करू शकत नाहीत. त्यांची पत्नी इस्रायलचीच आहे आणि त्यांच्या मुलांचा जन्मही तिथेच झाला. त्यांच्या बायका-मुलांकडे इस्रायलची नागरिकता आहे. पण मिश्रा म्हणतात की, भारतीय पासपोर्टमुळे त्यांना अनेक अडचणी येतात. अनेक देशांमध्ये जाण्यासाठी त्यांना व्हिसा घ्यावा लागतो.

ते उदाहरण देताना म्हणतात, "मला लंडनला जाण्यासाठी व्हिसा घ्यावा लागतो. पण जर तुमच्याकडे इस्रायलचा पासपोर्ट असेल तर तुम्हाला व्हिसाची गरज पडत नाहीत. पण व्हिसाचा अर्ज करायला इथे कोणतंही ऑफिस नाहीत. त्यासाठी मला टर्कीतील इस्तंबूलला जावं लागतं. तिथे येण्या-जाण्याचा खर्च फार आहे. या गोष्टींचा फार त्रास होतो." ते म्हणतात, "भारताशी माझी नाळ जोडली गेली, माझी भावनिक गुंतवणूक आहे. त्यामुळे मी तिथलं नागरिकत्व सोडू इच्छित नाही. पण त्याशिवाय मला काही विशेष फायदा होत नाही." तुमचा पासपोर्ट भारतीय असेल तर तुम्ही व्हिसा न घेता ६० देशांमध्ये प्रवास करू शकता. इतर देशांच्या तुलनेत ही संख्या फारच कमी आहे. पासपोर्ट रँकिंगमध्ये भारत १९९ देशांच्या यादीत ८७ व्या स्थानावर आहे.

दुहेरी नागरिकत्वाची अत्यंत गरज आहे. हरेंद्र मिश्रा म्हणतात की, भारतात जर दुहेरी नागरिकत्वाची सवलत मिळाली तर भारतीय नागरिकत्व सोडणा-या लोकांची संख्या कमी होईल.

अभिनव आनंदही असंच म्हणतात. त्यांना दुस-या देशाचं नागरिकत्व हवं पण त्यांचं म्हणणं आहे की, त्यांचा नाईलाज असल्यामुळे त्यांना असं करावं लागतं. त्या महिला आता भारतीय नागरिक नाहीत. त्यांच्याकडे ओसीआय कार्ड आहे पण त्यांचं म्हणणं आहे की, त्यांच्याकडे दुहेरी नागरिकत्व असतं तर आणखी चांगलं झालं असतं.

जगभरातल्या अनेक देशांमध्ये दुहेरी नागरिकत्व मान्य आहे. म्हणजे तुम्ही एकाच वेळी दोन देशांचं नागरिकत्व घेऊ शकता. पण भारतात दुहेरी नागरिकत्वाचा नियम नाही. म्हणजे जर तुम्हाला इतर कोणत्याही देशाचं नागरिकत्व हवं असेल तर तुम्हाला भारतीय नागरिकत्व सोडावं लागेल. पण परदेशी स्थायिक झालेल्या आणि तिथलं नागरिकत्व घेतलेल्या लोकांसाठी एक खास सुविधा सरकारने उपलब्ध करून दिलेली आहे. त्याचं नाव ओसीआय - ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया मध्ये समाविष्ट करण्यात आले.

भारताबाहेर बसलेल्या पण भारताशी घट्ट संबंध असलेल्या लोकांची संख्या लाखांच्या घरात आहेत. अशा लोकांना पूर्वी भारतात येण्यासाठी व्हिसा घ्यावा लागायचा. या लोकांसाठी २००३ साली भारत सरकारने आणखी एक योजना आणली. पीआयओ - पर्सन ऑफ इंडियन ओरिजीन. हे कार्ड पासपोर्टसारखंच दर दहा वर्षांसाठी जारी केलं जायचं. यानंतर २००६ साली भारत सरकारने ओसीआय कार्ड देण्याची घोषणा केली. काही काळ ही दोन्ही कार्ड वापरात होती, पण २०१५ साली सरकारने पीआयओ कार्ड रद्द केलं. आता फक्त ओसीआय कार्ड चालतात. हे कार्ड जवळ असणा-या परदेशस्थित भारतीयांना भारतात आयुष्यभर राहण्याची, काम करण्याची, आर्थिक व्यवहार करण्याची सवलत देतं. एकदा काढलेलं हे कार्ड आयुष्यभर चालतं.

भारताच्या गृह मंत्रालयाच्या वेबसाईटनुसार ओसीआय कार्ड धारकांना भारतीय नागरिकांसारखेच सगळे अधिकार असतात. पण ते निवडणूक लढवू शकत नाहीत, मतदान करू शकत नाहीत, सरकारी नोकरी किंवा घटनात्मक पद धारण करू शकत नाहीत आणि शेतजमीन खरेदी करू शकत नाहीत.

परदेशी जाणा-या भारतीयांची संख्या वाढेल. पंत म्हणतात की, सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता येत्या काही वर्षांत परदेशात स्थायिक होऊ पाहणा-या लोकांची संख्या कमी होईल. ते म्हणतात, "भारताची आर्थिक परिस्थिती इतर देशांपेक्षा चांगली आहे. इथेही आणखी संधी मिळतील. त्यामुळे लोक भारतात राहतील. अर्थात ज्या लोकांनी आधीच ग्रीन कार्डसाठी अर्ज केले आहे, ते मात्र अमेरिकेचं नागरिकत्व घेण्याची संधी सोडणार नाहीत."

# नागपंचमी



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीमध्ये खऱ्या अर्थाने बरेच सण खूप चांगले आहेत. यापैकी चांगला आणि मनाला भावणारा सण म्हणजे नागपंचमी. आज आपण नागपंचमीच्या सणाबद्दल थोडसं अवलोकना करणार आहोत. खरंतर हा सण खूप स्तुत्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारा आहे. या सणांमध्ये कुठलाही विपर्यास नाही. अंधश्रद्धा नाही. केवळ आणि केवळ निसर्ग रक्षणाच्या संदर्भात रूढ झालेला, तयार केलेला, अंमलात आणलेला सण म्हणून आपण नागपंचमीकडे पाहू.**



नागपंचमी सणाच्या आदल्या दिवशी नागोबाचा उपवास असतो. या दिवशी घरातल्या सर्व मुली महिला नागोबाच्या नावाने उपवास करतात. याचा अर्थ असा की तो भावा इतका प्रिय आहे. आणि त्याचं जतन व्हायला पाहिजे. हा दृष्टिकोन समोर ठेवून नागोबाच्या नावाने उपवास केला जातो. आदल्या दिवशी रात्री आयाबाया लेकरं बाळे सर्वजण हातावरती मेंदी काढतात. सणाचे निमित्ताने नवी कपडे घेतली जातात. आणि नागपंचमीच्या सणादिवशी प्रत्येक घरामध्ये पुरणपोळी, गोडधोड असे सर्व पंचपक्वान्न तयार करून. वारुळाची म्हणजे नागोबाची पूजा केली जाते. या सणाला पहिल्या वर्षी लग्न झालेल्या सर्व मुली माहेराला येतात. सर्वांच्या गाठी भेटी होतात. मैत्रिणी सोबत गप्पा गोष्टी झोका खेळणे असा आनंदाचा उत्साहाचा आणि निसर्ग रक्षणाचा सन मोठ्या उत्साहात सादर केला जातो. याच दिवशी गावात, गावाच्या बाजूला, शेतामध्ये जिथे जमेल तिथे भरपूर झोके बांधले जातात. आणि दिवसभर युवा, युवती, मुलं, महिला झोके खेळून आनंद द्विगुणीत करतात. पूर्वी चिखलाचा नागोबा तयार करायचे. त्यावर वेगवेगळ्या बिया विशेषतः करडीच्या बिया ढोबून त्याला सजवायचे. त्यानंतर त्यास गावातील मंदिरात ठेवायचे. सर्व लेकरं आयाबाया त्याची पूजा करायच्या. सोबत वारुळाची पूजन करायच्या. त्यानंतर सर्वजण आनंदाने घरामध्ये जेवण करायचे. खरंतर हा सण अशा अर्थाने वैज्ञानिक दृष्टीकोणासोबत यास श्रद्धेलाही जोडलेले दिसते.

### सणाचा वैज्ञानिक दृष्टिकोन काय आहे?

पावसाळा ऐन भरात असतो. सगळीकडे धान गवत. झाडी, झुडपं हिरवीगार झालेली असतात. वाढलेली असतात. अशावेळी सापांची निर्मिती ही मोठ्या प्रमाणावर होते. हे सर्व साप सगळेच विषारी आहेत असे नाही. आपल्याकडे नाग, मण्यार, घोणस अशा तीन-चार जाती महाराष्ट्रामध्ये विषारी आहेत. बाकी सर्व धामण किंवा तत्सम साफ तसे विषारी नाहीत. परंतु त्याची भीती खूप मोठ्या प्रमाणावर वाटते. म्हणून लोक सापाला मारतात. मध्यंतरी कायदा केल्यामुळे आता साप मारणे लोकांनी सोडून दिले आहे. गावागावात सर्पमित्र तयार झाल्यामुळे त्यांना पकडून ते जंगलात किंवा गावापासून दूर ठिकाणी सोडून दिले जाते. हे समाजामध्ये झालेलं सकारात्मक परिवर्तन आहे. असेच म्हणावे लागेल.

हाच दृष्टिकोन घेऊन वन्य प्राण्यांची विशेषता सापाची पूजा करावी. कारण तो साप शेतामध्ये राहिल्यास शेतीचे नुकसान करणारे उंदीर यांना तो खाऊन फस्त करतो. आणि आपल्या शेतीचं संरक्षण करतो. म्हणून सापाची पूजा करणे, या संदर्भात हा सण खास करून साजरा केला जातो. महत्वाचा भाग म्हणजे सापाचे संरक्षण व्हायला पाहिजे. त्याचे जतन व्हायला पाहिजे. आणि सापांना जगण्याचा अधिकार आहे. तो संरक्षित व्हायला पाहिजे. म्हणून खऱ्या अर्थाने पंचमीचा सण हा साजरा केला जातो. तेव्हा बंधू भावांनो सापांना मारू नका. त्याचं जतन करा. संरक्षण करा. कारण त्यालाही जगण्याचा अधिकार आहे. सोबत तो शेतीचा प्रत्यक्ष संरक्षक आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांना जतन करणे, ही मानवाची मुख्य जबाबदारी आहे. पृथ्वीवरची कुठल्याही प्राणी, पक्षाची, माणसाची जात संपुष्टात येऊ नये. ती संपली जाऊ नये याच्यासाठी आपण प्रयत्न करू...

# विकास सबनिसांच्या रुपाने, द्रोणाचार्यागत गुरु लाभला, व्यंगचित्रांचा लळा लाविला, गुरु भेटीने शिष्य सुखावला

आधुनिक केसरी




**एक काळ असा होता की, छापील दैनिक आणि साप्ताहिक वाचल्याशिवाय मराठी वाचकांचा दिवस सुरु होत नव्हता. असं दैनिक, साप्ताहिक हातात पडल्यावर, वाचकाची नजर सर्वप्रथम शोधायची, त्यातील व्यंगचित्र. कारण व्यंगचित्र हा नियतकालिकांचा आत्मा असायचा. दैनिकात संपादकाचं संपादकीय, रोजची महत्वाची घटना यांचा सारा सार, त्या व्यंगचित्रात एकवटलेला असायचा. स्व. बाळासाहेब ठाकरे, आर. के. लक्ष्मण आणि श्रीकांत ठाकरे या व्यंगचित्रकारांनी मराठी व्यंगचित्रकलेचा पाया रचला. त्यावर विकास सबनीस यांनी कळस चढविला. ८०/९० च्या दशकात वाचक महाराष्ट्र टाईम्स हातात पडल्यावर आरकेंचं "काय म्हणताय ?" हे पॉकिट कार्टून आणि लोकसत्ता हातात पडल्यावर विकास सबनीसांचं "कोपरखळी" हे पॉकिट कार्टून शोधायचे. नंतर पेपर वाचायचे. इतका लळा वाचकांना या व्यंगचित्रकारांनी लावला होता. या व्यंगचित्रांनीच, महाविद्यालयीन काळात मलाही भूरळ पाडली. मला त्यांचं वेड लागलं होतं. या कात्रणांनी माझ्याकडे दहा, बारा रजिष्टर भरली होती. या दोघांना गुरु मानून मी व्यंगचित्रांची पारायणं केली. व्यंगचित्रं गिरवू लागलो. आणि एक दिवस मीही मान्यताप्राप्त व्यंगचित्रकार झालो. याचं श्रेय विकास सबनीस सरांनाच जातं. व्यंगचित्रकारांच्या राज्य संमेलनात आणि मार्मिक पुरस्कार स्विकारतांना मी सबनीस सरांना पहिल्यांदा प्रत्यक्ष पाहिलं. गुरुदर्शनाने मी भारावलो. कृतकृत्य झालो. तो क्षण माझ्या जीवनातला अत्तर क्षण झाला. गुरुप्रीतीचा मला सदैव दरवळ देत राहिला.**

मार्मिक पुरस्कार स्विकारायला मी शिवसेना भवनात गेलो, तेव्हा दस्तुरखुद्द उध्दव ठाकरे, राज ठाकरे, विकास सबनीस, संजय मिस्तरी माझी वाट पहात होते. मी दिसताच विकाससरांनी माझं हसून स्वागत केलं. राज्यस्तरीय व्यंगचित्रकार संमेलनात, डोंबिवलीला आम्ही या पूर्वी भेटलो होतो. ओळखी झाल्या होत्या. तेव्हा विकाससरांनी व्यंगचित्रकलेच्या चार गोष्टी शिकविल्या होत्या. त्याचा इतका सुंदर उपयोग झालेला बघून सरांनी मला मिठी मारली. कौतुक केलं. माझी उध्दव ठाकरे आणि राज ठाकरेंना ओळख करुन दिली. तेथून आम्ही, आमच्या व्यंगचित्रांचं जिथं प्रदर्शन भरवलं होतं तिथं गेलो. नंतर, वांद्र्याला रंगशारदात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते मार्मिक पुरस्कार स्विकारला. या सर्व प्रसंगात सबनीससर सोबत होते. मी त्यांच्या व्यंगचित्रांना बघून व्यंगचित्रकला शिकलो, याचं त्यांना खूप अप्रुप वाटत होतं. त्यांच्या निखळ कौतुकाने मी भारावून गेलो होतो. मोठी माणसं, मनानेही मोठीच असतात, याचा अनुभव घेत होतो.

विकाससरांची आणि माझी प्रत्यक्षातील पहिली भेट झाली, ती डोंबिवलीच्या १९९७ च्या व्यंगचित्रकार संमेलनात. सरांना मी माझी व्यंगचित्र दाखविली. त्यांनी काही महत्वाच्या टिप्स दिल्या. व्यंगचित्रकाराकडे काकदृष्टी असावी, विनोदबुध्दी असावी, चपखल शब्दभांडार असावं आणि समाजाकडे डोळस बघता यावं, असा मंत्र त्यांनी दिला. आपल्या विनोदाने कुणाच्या मनावर जखमा व्हायला नको. मात्र, त्याला कोपरखळी बसायला हवी.! असं ते मानत. त्यांचा हा मंत्र मी आयुष्यभर जपला. लोकशाही, जनशक्ती, गावकरी, लोकमत, सकाळ, देशदूत या दैनिकातून व्यंगचित्र काढली. अनेक दिवाळी अंकात व्यंगचित्रमालिका रंगविल्या. याचं श्रेय अर्थातच विकाससरांकडे आणि लक्ष्मणसरांकडे जाते. माझ्या व्यंगचित्रकलेची पायाभरणी, त्यांच्याच व्यंगचित्रांनी केली होती. सर आणि त्यांच्या सौभाग्यवती सौ. भारतीताईंसह काढलेले छायाचित्र, त्या क्षणांसह आजही मला, भूतकाळात घेवून जाते.

एकदा दादरला सरांच्या घरी जाणं झालं. ताई घरी नव्हत्या. विकाससर घाईत होते. त्यांचा सुपुत्र परिमल परदेशातून विमानतळावर येणार होता. सर त्याला रिसिव्ह करायला निघणार होते. इतक्या गडबडीतही सरांनी माझं हसतमुखाने स्वागत केलं. मी नको नको म्हणत असतांना, स्वतःच्या हाताने चहा बनवला. आम्ही दोघांनी चहा घेतला. चर्चा केली आणि मगच त्यांनी मला निरोप दिला. मी लोकसंख्या विस्फोट व्यंगचित्र प्रदर्शन भरवत होतो. त्यासाठी मी सरांकडे त्यांचे एक व्यंगचित्र मागितलं होतं. सरांनी मला ते तात्काळ पाठवून, त्यांच्या माझ्यावरील स्नेहावर, मोहर उमटवली होती. त्यांचं वागणं विनम्र, बोलणं मधाळ आणि नातं आपलंसं करणारं आणि निखळ प्रेम देणारं होतं. "बीएन, व्यंगचित्रकार हा २४ तास डोळसपणे बघणारा हवा. त्याच्यात सदैव एक चित्रकार, बातमीदार, लेखक, समिक्षक, संपादक वावरला पाहिजे. तरच तो खरा व्यंगचित्रकार होवू शकतो." असं ते सांगत. "व्यंगचित्रकार हा कुणा एकाच्या बाजूचा अथवा त्याच्या विरोधात नसावा. त्याने सतत जनतेच्या बाजूने असावं !" असं ते सांगत. आणि, शेवटपर्यंत ते तसेच वागले. बातम्या वाचतांना, व्यंगचित्रकाराला बिटवीन द लाईन्स वाचण्याची शोधक वृत्ती हवी. तरच त्याला त्यातील नेमकं व्यंग, विसंगती टिपता येते, हा त्यांचा खास कानमंत्र.

विकास सबनीस यांचा जन्म १२ जुलै १९५० रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे आई-वडील व्यवसायाचे शिक्षक होते. वडील मार्मिक आणि सामनामध्ये स्तंभ लेखन करायचे. शालेय शिक्षण घेत असतांनाच विकासजींना चित्रकलेत गती होती. ते पाहून त्यांच्या आई-वडिलांनी बालपणातच त्यांची आवड जोपासली. उत्तम उत्तम चित्रकलेचं साहित्य पुरवलं. पाठपुरावा केला. मुलाचा चित्रकलेकडील कल आणि आवड बघून त्यांनी त्याला, महाविद्यालयीन शिक्षणासाठी जे जे स्कूल ऑफ आर्ट्सला पेंटिंग अँड फाईन आर्ट्सला अॅडमिशन घेऊन दिली. येथील शिक्षण घेत असतानाच, त्यांच्यावर व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे आणि आर के लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांचा प्रभाव पडला. चित्रकलेचे तंत्रशुद्ध शिक्षण घेतल्यानंतर, त्यांनी चित्रकलेतील व्यावसायिकतिकडे न वळता, व्यवसाय म्हणून व्यंगचित्रकला हे क्षेत्र निवडलं. त्यातच त्यांनी आपलं करिअर बनवलं. आणि, आयुष्यभर त्यांनी व्यंगचित्र कलेची साधना केली. व्यंगचित्रकलेला शिखरावर पोहोचवलं. पोट भरण्यासाठी आणि संसार चालवण्यासाठी दुसरी कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय न करता, केवळ व्यंगचित्रकलेवरच ५० वर्षे चरितार्थाचे चालविणारे, विकासजी एकमेव व्यंगचित्रकार असावेत.




व्यंगचित्रकलेतील भिष्माचार्य आणि माझे गुरु विकासजी सबनीस आणि सौ.भारतीताई सबनीसांसोबतचा एक सुवर्णक्षण !

आपल्या व्यंगचित्रकलेची सुरुवात त्यांनी, प्रबोधनकार ठाकरे यांच्या संपादनाखाली निघत असणाऱ्या मार्मिक या साप्ताहिकांमधून केली. एप्रिल १९६८ ला त्यांचं पहिलं व्यंगचित्र प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांनी कौतुकाने छापले. प्रबोधनकारांचा हा त्यांना शुभाशीर्वादच ठरला. त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्यातील व्यंगचित्रकलेचा दर्जा ओळखून, त्यांना मार्मिक मधून नियमित संधी दिली. पुढे बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसेनेतील वावर आणि व्याप प्रचंड वाढला. त्यामुळे त्यांनी मार्मिक मधील आपली व्यंगचित्रकला थांबवली. ही धूरा त्यांनी विकास सबनीस यांच्याकडे दिली. पुढे १२ वर्षे मार्मिक मधील "रविवारची जत्रा" आणि मुखपृष्ठाची जबाबदारी विकास सबनीस यांनी समर्थपणे, अखंड सांभाळली. मार्मिक साप्ताहिकाला बाळासाहेबांनी जो दर्जा मिळवून दिलेला होता, तो दर्जा त्यांनी टिकवून तर ठेवलाच, शिवाय त्याला सर्वोच्च शिखरावर नेले.

मार्मिक नंतर विकास सबनीस यांनी लोकसत्ता मधून आपले दैनिक सदर "कोपरखळी"च्या रूपाने चालवले. त्यानंतर टाइम्स ऑफ इंडिया, सकाळ, लोकप्रभा, चित्रलेखा, महानगर, नवशक्ती, यासारख्या नियतकालिकांमधून आणि महाराष्ट्रातील तमाम दिवाळी अंकांमधून, त्यांच्या व्यंगचित्रांनी, मराठी रसिकांना सतत हसवत ठेवले. व्यंगचित्रकलेला लोकप्रिय करण्यासाठी, त्यांनी कधीही कमरेखालचे विनोद वापरले नाहीत. व्यंगचित्रकलेला सवंग होऊ दिले नाही. व्यंगचित्रकलेतील चित्र आणि भाषा यांचा दर्जा सतत उंचावत ठेवला. पूर्णवेळ राजकीय व्यंगचित्रकारिता करणारे आणि या क्षेत्रात सुवर्ण महोत्सवी कामगिरी करणारे, ते मराठीतील एकमेव व्यंगचित्रकार असावेत. त्यांच्या व्यंगचित्रकार म्हणून कारकिर्दीतील पन्नास वर्षीय "सुवर्ण महोत्सवी" वाटचालीबद्दल, व्यंगचित्रकार राज ठाकरे यांच्या हस्ते त्यांचा जाहीर "जीवनगौरव पुरस्कार" देऊन सत्कार करण्यात आला होता. त्यावेळेस राज ठाकरे म्हणाले होते "विकास सबनीससारखा व्यंगचित्रकार, परदेशात विशेषता युरोपात जन्माला आला असता, तर त्यांच्या जीवनाचे सोने झाले असते ! परदेशात लेखक, कलावंतांना जो मानसन्मान मिळतो, जिवंतपणी आणि मृत्यूनंतरही त्यांची जी दखल घेतली जाते, ती दखल भारतात आणि विशेषता महाराष्ट्रात घेतली जात नाही, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली होती. जी शब्दशः खरी आहे. सबनिससर मात्र आपल्या कलासाधनेवर मनोमन खूष आणि समाधानी होते.

विकास सबनीस यांनी, आपल्या व्यंगचित्रकलेच्या पन्नास वर्षाच्या कारकिर्दीत, अनेक राजकीय व्यक्तिमत्व, व्यंगचित्रकलेतून साकारली. मात्र, त्यांच्या मनाला कायम भुरळ पाडली, ती भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार देवानंद यांनी. या दोघांना प्रत्यक्षात न भेटता ही, त्यांची असंख्य व्यंगचित्र सरांनी रेखाटली. या दोघांना भेटण्याचे त्यांचे स्वप्न, शेवटी स्वप्नच राहिले ! परंतु, त्यांच्या मनातील सिंहासनावरून, या दोन्ही व्यक्ती कधीच खाली उतरल्या नाहीत. श्रीमती इंदिरा गांधी यांच्यातला कणखरपणा, बाणेदारपणा आणि दमदार नेतृत्वशैली, ही त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती, असं ते सांगायचे. इंद्रजींच्या चेहऱ्यावरील प्रत्येक रेष आणि रेष ही व्यंगचित्रकारासाठी आव्हान होती, असं ते सांगत. त्यांचे नाक हीच त्यांची ओळख होती, आणि तेच ते प्रभावीपणे रेखाटत. त्यांच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त जेव्हा त्यांची मुलाखत घेतली गेली, तेव्हाही त्यांनी, श्रीमती इंदिरा गांधी यांचेच अर्कचित्र रेखाटून, त्यांना आपल्या मनातील भावांजली, आदरांजली अर्पण केली होती.

आपल्या पन्नास वर्षीय व्यंगचित्रकलेच्या वाटचालीचा गोषवारा, त्यांनी "व्यंगनगरी" आणि "आय लव युरोप" या पुस्तकातून अक्षय करून ठेवला आहे. "रेषा विकासाची - भाषा पन्नास वर्षाची" हा व्यंगचित्रकलेवर आधारित कार्यक्रम देखील, ते सादर करायचे. व्यंगचित्रकला ही निखळ मनोरंजनातून, समाजमन जागृत करण्याची, एकमेव कला असल्याचे ते सांगत. उत्कृष्ट व्यंगचित्रकार होण्यासाठी, चित्रकलेचा परीपूर्ण अभ्यास, भाषेवर प्रभुत्व आणि सामाजिक भान असायला हवे, असं ते मानत. देवानंद यांच्या चित्रपटातील "मै जिंदगी का साथ निभाता चला गया, हर फिक्र को धुऐ मे उडता चला गया !" हे त्यांचं आवडतं गाणं होतं. या गाण्यातील बोलाप्रमाणे व्यंगचित्रकलेला जीवनभर साथ देत, त्यांनी २७ डिसेंबर २०१९ रोजी, वयाच्या ६९व्या वर्षी, या जगाचा निरोप घेतला. आयुष्यभर समाजाचे मनोरंजन आणि प्रबोधन करणारा हा कलावंत, स्वतः हसत हसत, जगाला रडवून निघून गेला.!

महाराष्ट्रात, मराठी व्यंगचित्रकलेचा पाया बाळासाहेब ठाकरे, आर. के. लक्ष्मण आणि श्रीकांत ठाकरे या त्रिमूर्तीने रचला. त्यावरचा कळस विकास सबनिसांनी चढविला ! असं म्हटलं तर, वावगं ठरणार नाही. व्यंगचित्रकलेचा ध्यास घेवून महाराष्ट्रात व्यंगचित्रकारांची वारी अखंड सुरु आहे. या वारीतला एक वारकरी होण्याचं भाग्य, मला विकासजींमुळे मिळालं. मी त्यांच्या सोबतीने कार्टुनिस्ट कंबाईनच्या संमेलनात वावरलो. त्यांच्या सोबत माझी व्यंगचित्रं प्रदर्शनात लागली, त्यांच्या उपस्थितीत मी व्यंगचित्रकलेचा सर्वोच्च असा "मार्मिक व्यंगचित्रकार पुरस्कार" स्विकारला. गुरुने आपल्या शिष्याचं बोट धरुन, त्याला बाराखडी गिरवायला शिकवावं. आणि, बघता बघता आपला शिष्य, त्या विषयातल्या सर्वोच्च शिखरावर पोहचावा, तो आनंद मी सबनीस सरांच्या चेहऱ्यावर पाहिला आहे. बीएन. तू एकलव्यासारखा व्यंगचित्रकला शिकलास. मात्र, यशाचं श्रेय मला दिलं, हे तुझ्यातील विनम्रतेचं दर्शन आहे, असं ते मला म्हणाले होते. तेव्हा माझ्या अंगावर मुठभर मांस चढले होते. द्रोणाचार्यांनी एकलव्याकडून आपला अंगठा मागून घेतला होता. मात्र, विकाससरांनी मला त्यांच्या हाताने चहा करुन, मला चहा पाजला होतो. तो क्षण, मी आयुष्यात कधीही विसरु शकणार नाही. या क्षणाने मला, विकासजींचे हिमालयाएव्हढे उत्तुंग दर्शन घडविले आहे. ती छबीच, मी माझ्या मनःपटलावर कोरुन ठेवली आहे. आज त्या क्षणांना व्यक्त करुन, मला ऋणाईत झाल्यासारखे वाटत आहे.

# "बालरंगभूमी"



कस्तुरी देवरुखकर
संपर्क क्र. : ८२९११४९९९२

आधुनिक केसरी

**रुपेरी पडद्यावर जेव्हा आपण एखादा कलाकार पाहतो तेव्हा आपल्याला त्या ताऱ्याभोवती असलेलं चंदेरी वलय दिसतं. परंतु, त्या वलयांकित आवरणापलिकडचं विश्व वेगळंच असत. कित्येक वेळा कथानकातील पात्र आपल्या मनात घर करून जातं. त्याची शैली आकर्षित करून जाते. पण ती भूमिका वठवताना त्यापाठी पात्राने घेतलेली मेहनत, भूमिकेची जडणघडण सहजासहजी लक्षात येत नाही. या साठी तशी भेदक नजरच असावी लागते. अशा अनेक मूल्यांचे, अभिनयाचे बाळकडू देणारी, बालमनावर कलेचे महत्त्व बिंबवणारी, अजरामर संस्था म्हणजे सिनेजगताची जननी "रंगभूमी" अथवा "बालरंगभूमी".**

ज्याप्रमाणे ओल्या मातीला आकार देणं सोपं असत. त्याचप्रमाणे कुठलीही कला अंगी भिनवायची असेल तर बाल्यावस्थेची निवड केली जाते. बालमन हे कोवळं असतं. या वयात संस्कारांचे बीजरोपण उत्तमरित्या होऊ शकते.काही वर्षांपूर्वी बालरंगभूमीकडे वळणारी पावलं मर्यादित होती. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या बालनाट्यसंस्था कार्यरत होत्या. बालनाट्याकडे मुलांचे शालेय सुट्टीतील करमणूकीचे साधन म्हणून पाहिले जायचे. परंतु त्यावेळी त्या नाटकांना लाभणारा प्रेक्षक वर्ग खूप चौकस होता.

याउलट आता वर्षाकाठी अनेक बालनाट्य शिबिरे भरवली जातात. कित्येक अभिनय कार्यशाळा चालवल्या जातात. आता बालरंगभूमीकडे केवळ करमणूकीचे साधन म्हणून न पाहता, आपल्या मुलांच्या भविष्याची तरतूद म्हणून व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहिले जाते. याचे कारण कदाचित "रियालिटी शो" चे अमर्याद फुटलेले पेव असावे. प्रत्येकाला आपलं मूल लवकरात लवकर सेलिब्रेटी झालेलं पहायचय. या अट्टहासापायी आजकाल कुठल्याही प्रकारची सखोल चौकशी न करता, गुणात्मक दर्जा न बघता कार्यशाळांचे वर्ग आणि गल्ले भरले जात आहेत. त्यावर कहर म्हणजे या कार्यशाळांच्या आपापसात असलेल्या स्पर्धांची तृष्णा भागवण्यासाठी या लहान मुलांची ओढाताण होत असते. इतकं करूनही हल्लीच्या बालनाट्याला हवा तसा प्रेक्षक वर्ग लाभत नाही. क्वचित एखादा प्रयोग हाऊसफुल्ल होतो. त्यातही पन्नास टक्क्यांहून अधिक प्रेक्षक वर्ग हा त्या नाटकात काम करणाऱ्या बालकलाकाराचे आई-वडील, आजी-आजोबा, नातलग असतात. प्रत्यक्षात बाहेरून तिकिट खरेदी करून येणारा प्रेक्षक त्यामानाने कमीच. असे का होते याची कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. नाण्याच्या या बाजूचं गांभीर्याने चिंतन व्हायला हवं.

बरं ही झाली नाण्याची एक बाजू. दुसरी बाजू यापेक्षा सुखावह आहे. आजच्या पिढीतील बालवर्गाकडे कटाक्ष टाकता एक वस्तुस्थिती प्रकर्षाने जाणवते की, आजची ही पिढी लहानपणापासूनच कम्प्युटर, मोबाईल, इंटरनेट च्या जगात वावरत असल्या कारणाने अतिशय चलाख आहे. त्यांची बुद्धिमत्ता, प्रसंगावधानता, दामदुपटीने मेहनत करायची तयारी अवाक् करणारी आहे. गरज आहे ती या हिऱ्यांना पैलू पाडण्याची, या कलागुणांच्या वाहत्या झऱ्याला योग्य वाट मोकळी करून देण्याची. जमेची बाजू म्हणजे काही नाट्यसंस्था अशाही आहेत ज्या मुलांच्या सर्वांगिण कलाविकासासाठी सचोटीने काम करत आहेत. नवनवीन उपक्रम राबवत आहेत. बालकलाकारांना हक्काच व्यासपीठ मिळवून देत आहेत. मुलांमध्ये आत्मविश्वास जागवत आहेत. दुर्दैवाने अशा ठिकाणी पालकांचा कल कमी दिसून येतो. बाजारीकरणाच्या झगमगाटात मोठमोठ्या वल्गना करून दिशाभूल करणाऱ्या तथाकथित संस्थांच्या उंबरठ्यावर ही गर्दीची लाट धावतेय असे चित्र नजरेस पडते.

आणखी एक महत्वाची बाब मला येथे नमूद कराविशी वाटतेय. माझी मुलगी बालनाट्यात काम करत आहे. त्यामुळे पालकांच्या मनोवृत्तीचा एकंदरीत आढावा घेता माझ्या अस निदर्शनास आले जसे की, काही पालक सतत आपल्या पाल्याची इतरांच्या पाल्ल्या बरोबर तुलना करत रहातात. कळत नकळतपणे ते मुलांच्या मनात हा मत्सर, असुरक्षिततेची भावना उतरवत चालले आहेत. उदाहरणार्थ, एका मुलाला नाटकात अमकी तमकी भूमिका मिळाली की ती भूमिका त्याच नाटकातील दुसऱ्या मुलाला मिळालेल्या भूमिकेशी तुलनात्मक किती लहान अथवा मोठी आहे हे पालकांकडून बघितले जाते आणि त्यावरून प्रसंगी वाद, नाराजी अस कलुषित वातावरण निर्माण केलं जातं. माझ्या मते कुठलीही भूमिका लहान, मोठी नसते. ती कशाप्रकारे सादर केली जातेय ते जास्त महत्वाच. यावरच त्या भूमिकेचं, पर्यायाने नाटकाच यश अवलंबून असत. ही साधी गोष्ट पालकांच्या नजरेआड होतेय. किंबहुना मी म्हणेन आपण आपल्या मुलांना इतर मुलांच्या कामाच अवलोकन करायला शिकवल पाहिजे. इथे आपणच भांडत बसतो. त्यामुळे मुलांना चुकीचा संदेश दिला जाऊन सहकार्याने काम करण्याच्या वृत्तीला पुरेपूर तडा जातोय.

सरते शेवटी एवढंच सांगेन, मी माझ्या निरिक्षणातून ज्या बाबी लक्षात आल्या त्या मांडण्याचा प्रयत्न केला. माझा कुणावर वैयक्तिक आकस अथवा राग, लोभ नाही. असेलच तर बालनाट्य चळवळीबद्दल, बालरंगभूमीबद्दल मनस्वी कळकळ... कारण या सर्वातूनच तावून सुलाखून निघणार आहेत सक्षम अभिनय अंगीकारलेले उद्याचे अष्टपैलू कलाकार.

**"रंगदेवता व रंगभूमीला त्रिवार वंदन"!!**




# मीराबाई चानूचा प्रेरणादायी प्रवास

आधुनिक केसरी

**भारताची आघाडीची ऑलिम्पिकपदक विजेती वेट लिफ्टर मीराबाई चानू हिने बर्मिंगहम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ४९ किलो वजनी गटात ८८ किलो वजन उचलून भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. विशेष म्हणजे मागील २०१८ साली गोल्डकोस्ट येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेतही तिने सुवर्णपदक जिंकले होते. सलग दोन राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिकून मीराबाईने इतिहास रचला आहे. अर्थात मोठ्या स्पर्धेत पदक जिंकण्याची तिला आता सवयच झाली आहे.**



मागील वर्षी जपानची राजधानी टोकियो येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत मीराबाई चानू हिने रौप्य पदकाची कमाई केली होती. मीराबाई चानूच्या या राष्ट्रकुलमधील या सुवर्णपदकाने संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोरोना, पाऊस, ढगफुटी, महापूर, दरडी कोसळणे यासारख्या घटनांनी त्रासलेल्या देशवासियांना मीराबाई चानुने जल्लोष करण्याची संधी मिळवून दिली याबद्दल तिचे आभारच मानावे लागेल. वेटलिफ्टिंग सारख्या पुरुषांची मक्तेदारी असलेल्या खेळात ऑलम्पिक, राष्ट्रकुल सारख्या मोठ्या स्पर्धेत पदक जिंकणे ही खुप मोठी कामगीरी आहे. मणिपूर राज्यातील एका छोट्या गावातील गरीब कुटुंबात जन्मलेल्या मीराबाईचा सुवर्णपदकापर्यंतचा प्रवास सोपा नव्हता.

८ ऑगस्ट १९९४ ला मणिपूर इथल्या छोट्या गावात मीराबाई हिचा जन्म झाला. इंफाळपासून तिचं गाव २०० किलोमीटर दूर होतं. त्याकाळी मणिपूरच्याच वेटलिफ्टर कुंजुराणी देवी स्टार होत्या आणि अथेन्स ऑलिंपिक खेळायला गेल्या होत्या. त्यांचा आदर्श मिराबाईने घेतला आणि सहा भावंडात सर्वात छोटी असलेल्या मिराबाईने वेटलिफ्टर बनण्याचा निश्चिय केला. २००७ झाली मिराबाईने जेंव्हा वेटलिफ्टिंगचा सराव सुरू केला तेव्हा लोखंडाचा बार नसल्याने बांबूच्या बारनं सराव केला. गावात प्रशिक्षणाची सुविधा नसल्याने गावापासून ५०-६० किलोमीटर अंतरावरील गावात जाऊन प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. गरीब कुटुंबात जन्मलेल्या मिराबाईकडे अंडी, मटण, चिकन यासारखा महागडा आहार करण्यास देखील पैसे नसायचे तरीही तिने सराव सुरू ठेवला. कठोर मेहनत घेतली आणि त्याचे फळ तिला मिळाले. ती अंडर १५ आणि अंडर १७ ची ज्युनियर चॅम्पियन बनली. ज्या कुंजुराणी देवी यांना तिने आदर्श मानला त्याच कुंजुराणी देवी यांचा १२ वर्षाचा विक्रम तिने १९२ किलो वजन उचलून मोडीत काढला.

तिने रियो ऑलिम्पिकची तयारी सुरू केली मात्र पुरेशा साधन समुग्रीच्या अभावी रियो ऑलिंपिकला पात्र ठरण्यास तिला अपयश आले. 2016 च्या ऑलिम्पिकमध्ये मिराबाईला वजन उचलता आले नाही. ऐनवेळी तिचा हात आखडला त्यामुळे तिला पदक जिंकता आले नाही सलग दोन ऑलिम्पिकमध्ये अपयश आल्याने ती निराश झाली पण डगमगली नाही. अनेकांनी तिला खेळ सोडण्याचा सल्ला दिला पण तिने हार मानली नाही. उलट आणखी जोमात सराव सुरू केला त्यामुळे तिला तिचा हरवलेला फॉर्म गवसला. ४८ किलो वजनाच्या मीराबाईने तिच्या चारपट अधिक म्हणजे १९४ किलो वजन उचलत वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक मिळवले. या सुवर्णपदकाच्या जोरावरच तिने टोकियो ऑलिम्पिकचे तिकीट मिळवले.

रियो ऑलिम्पिकमध्ये प्रवेश न मिळाल्याने निराश झालेल्या मिराबाईने ऑलिम्पिकमध्ये प्रवेश मिळवायचाच, इतकेच नाही तर देशासाठी पदकही मिळवायचे असे स्वप्न पाहिले ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने रात्रीचा दिवस केला. त्याचे फळ तिला मिळाले आणि सुवर्णपदक जिंकण्याचे तिचे स्वप्न साकार झाले. त्या यशावरही ती समाधानी राहिली नाही देशासाठी आणखी पदक करण्याचा निश्चय तिने केला आज राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून तो निश्चयही तिने पूर्ण केला. जिद्द, चिकाटी, मेहनत आणि करून दाखवण्याची धमक असल्यास जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही हे मिराबाईने दाखवून दिले. मिराबाईच्या या पदकाने देशातील महिला खेळाडू वेटलिफ्टिंग सारख्या पुरुषांची मक्तेदारी असलेल्या खेळाकडे वळतील. मीराबाई देशातील महिलांसाठी प्रेरणास्त्रोत ठरली आहे. मीराबाईचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910



महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेच्या स्थापनेपासून कार्यरत असलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या साधना कानडे काकु यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर पश्चिम मतदार संघाचे लोकप्रिय आमदार संजय शिरसाट, जिल्हाप्रमुख राजेंद्रभाऊ जंजाळ, विजयाताई शिरसाट, हर्षदा शिरसाट, मा.नगरसेविका शिल्पाराणी वाडकर, सिद्धांत शिरसाट, सागर वाडकर यांची उपस्थिती होती.



महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करताना मा.नगरसेविका शिल्पाराणी सागर वाडकर

# कै.दौलतराव मराठे स्वेच्छा रक्तदान चळवळीतील भीष्माचार्य : डॉ. आशुतोष काळे

## भव्य रक्तदान कार्यक्रमाने दौलतराव मराठे यांना आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** कै. दौलतराव मराठे म्हणजे स्वेच्छा रक्तदान चळवळीतील भीष्माचार्य होते त्यांनी केलेले रक्तदान क्षेत्रातील कार्य आपण अधिक जोमाने पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली होईल, असे उदगार जनकल्याण रक्तकेंद्रचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. आशुतोष काळे यांनी काढले.

डॉ. काळे पुढे म्हणाले, दौलतराव मराठे हे रक्तदान कार्यांत झोकून देणारे कार्यकर्ते होते. त्यांनी अनेकांना रक्तदान करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या आयुष्याचा शेवटच्या क्षणापर्यंत जनकल्याण रक्तपेढीतर्फे रक्तदान शिबिरांचे आयोजनाचे कार्य अविरतपणे चालू ठेवले. आत्तापर्यंत हजारो गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून दिले. जनकल्याण रक्तपेढी च्या कार्यात ते कार्यमग्न असत. मातृभूमी प्रतिष्ठान आयोजित रक्तदान कार्यक्रमाच्या उदघाटनपर भाषणात बोलत होते.

कै. दौलतराव मराठे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त कर्वेनगर मधील गिरीजा शंकर सभागृहात मातृभूमी प्रतिष्ठान तर्फे भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. शिबिराच्या उदघाटनप्रसंगी मातृभूमी प्रतिष्ठान चे सायंदेव देहाडराय, प्रथमेश जाखलेकर, गिरीजा शंकर सोसाटीचे अध्यक्ष संजय कबाडे, सचिव कैलास धंड, सुधीर जवळेकर, उल्हास जोशी, उदयन पाठक, संतोष अनगोळकर, वेदांत मराठे, संजय मराठे, अनिल वाघ यांची मुख्य उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्तविक गणेश तांबे यांनी केले. कल्याणी कोंडे यांनी रक्तदान गीत सादर केले. एकूण १२६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कर्वेनगर, वारजे परिसरातील नागरिक व हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते.

# सांडपाणी व ड्रेनेजमुळे सुखना नदी प्रदूषित

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात; प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महानगराच्या सारोळा -कोलठाण शिवारातील सुखदेव बाबांच्या गुहेपासून उगम पावणारी सुखना नदी प्रचंड वृक्षतोड, सततचे दुष्काळ आणि शहरातील नागरिकांच्या व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे तसेच औरंगाबाद शहरातील विविध नाल्यातील सांडपाणी व ड्रेनेजचे पाणी या सुखना नदी पात्रात सोडले जात असल्यामुळे शिवाय चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रीत पाणी या नदीत सोडले जाते. त्यामुळे सुखना काठच्या गावातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

शेतीसह, पिण्याचे पाणी प्रदुषित आहे. त्यामुळे नदी काठच्या गावात पोटाचे व फुफुसाचे व इतर आजार बळावत चालले आहे. या संदर्भात सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीने वेळोवेळी आवाज उठवून जिल्हाधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, महानगर पालिका, लोकप्रतिनिधी यांना निवेदने दिली आहे. मात्र त्याची कोणतीही दखल घेतली गेली नाही. प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय चिकलठाणा परिसरात असून सर्रासपणे डोळेझाक करित आहेत. प्रशासन व पदाधिकारी यांचे देखील या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळण्याचे काम होत आहे.

चिकलठाणा नदी पात्रात घनकचरा टाकल्या जातो. त्यामुळे दुर्गंधी सुटते. सुखना नदीच्या प्रदुषणाकडे लक्ष देऊन प्रदुषण थांबवावे. कायम स्वरूपी उपाय योजना करावी अन्यथा सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने व्यापक जन आंदोलन केले जाईल, असा इशारा सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांनी दिला आहे.



# वर्षा उसगावकर, किशोरी शहाणे यांच्या दमदार नृत्याने सर्वांनाच लावले वेड

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** 'फक्त मराठी सिने सन्मान सोहळा २०२२' मोठ्या थाटात आणि दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा सांभाळत होते अमेय वाघ आणि ओमकार भोजने. दोघांच्याही विनोदकौशल्याने कलाकारांचे आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करत निवेदनाची जबाबदारी उत्कृष्ठरीत्या पार पाडली. आशिष पाटीलच्या गणेश वंदनेने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला. या फक्त मराठी सिने सोहळ्याचा अत्यंत खास क्षण म्हणजे रंगभूषाकार विद्याधर भट्टे यांचा सन्मान. विद्याधर यांनी अनेक सिनेमांसाठी मोठ्या मोठ्या भूमिकांना रूप देऊन घडवण्याच कार्य केले आहे.

'लगे राहो मुन्ना भाय', 'परिनीता', 'धर्मवीर' अश्या अनेक चित्रपटातल्या कठीण भूमिकांना रंग देऊन उभ केले. त्यांनी दिलीप प्रभावळकर, ऐश्वर्या राय-बच्चन, विद्या बालन अश्या अनेक दिग्गज कलाकारांना मेकअप करून हुबेहूब भूमिका घडवल्या. अशा विद्याधर भट्टे यांचा सन्मान सिने तारका विद्या बालन यांच्या हस्ते पार पडला. तसेच आपल्या मराठी चित्रपटसृष्टीची शान म्हणजेच गायक आणि संगीतकार अजय-अतुल. अनेक मराठी आणि हिंदी गाण्यांना वेडावून टाकणारे सूर आणि संगीत देऊन मराठीचा झेंडा सात समुद्रापार नेणाऱ्या या जादुई जोडीचा 'फक्त मराठीने' विशेष सन्मान जाहीर केला. सन्मान स्वीकारण्यासाठी आपल्या कामांमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांना या सोहळ्याला उपस्थित राहता आले नाही. हरहुन्नरी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांना विको पॉप्युलर फेस ऑफ द इयर या सन्मानाने सन्मानीत करण्यात आले.

त्याचबरोबर आपल्या मराठी चित्रपटसृष्टीला ज्यांनी गेले कैक दशकं उत्तमोत्तम भूमिकांनी आणि चित्रपटांनी खिळवून ठेवलं ते म्हणजे विनोदाचे बादशाह ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांचा देखील सन्मान 'फक्त मराठीने' केला. तसेच त्यांच्या काही गाजलेल्या विविध भूमिकांना घेऊन कलाकारांनी त्यांना मानवंदना म्हणून काही स्किट्स सादर केले. सचिन पिळगावकर यांच्या मातोश्री श्रीमती सुनीला शरद पिळगावकर यांच्या हस्ते ज्येष्ठ व दिग्गज अभिनेते अशोक सराफ यांना सन्मानित करण्यात आले.

सर्वोत्कृष्ठ अभिनेत्याचा सन्मान प्रसाद ओक यांना धर्मवीर चित्रपटासाठी प्राप्त झाला. तसेच सर्वोत्कृष्ठ अभिनेत्रीचा सन्मान अमृता खानविलकर हिला चंद्रमुखी चित्रपटासाठी प्राप्त झाला आहे. सर्वोत्कृष्ठ कथाकार हा सन्मान विश्वास पाटील यांना चंद्रमुखी चित्रपटासाठी मिळाला. त्याचबरोबर सर्वोत्कृष्ठ दिग्दर्शनाचा सन्मान धर्मवीर चित्रपटासाठी प्रवीण तरडे यांना मिळाला. व सर्वोत्कृष्ठ चित्रपटाचा सन्मान "धर्मवीर"ने पटकावला. फक्त मराठी सिने सन्मान सोहळ्याच हे पाहिलंच वर्ष. अनेक दिग्गजांनी या सोहळ्याला येऊन फक्त मराठीशी असलेलं नात अधिक घट्ट केल आहे. सोनाली कुलकर्णी, वर्षा उसगावकर, किशोरी शहाणे यांच्या दमदार नृत्याने सर्वांनाच वेड लावलं. हा सोहळा लवकरच 'फक्त मराठी' या वाहिनीवर प्रेक्षकांसाठी प्रसारित करण्यात येणार आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



# जगदंबा शाळेची हर घर तिरंगा उभारणीसाठी जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

पैठण : भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वराज्य महोत्सव राबविण्यात येत आहे. या योजनेला अनुसरून १ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट या कालावधीत जनजागृती करण्याच्या अनुषंगाने पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र चौढाळा येथील जगदंबा इंग्लिश स्कूल येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी द्वारे जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व व देशभक्तीचा जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्याचे स्मरण व्हावे. या अनुषंगाने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी राष्ट्रध्वज उभारण्याची जनजागृती केली.

यावेळी मुलांनी भारत माता की जय, वंदे मातरम, आदी घोषणा दिल्या मुलांच्या या कार्याचे कौतुक होत आहे. यावेळी शाळेचे संस्थापक प्रशांत नरके, मुख्याध्यापिका मयुरी खोबरे, संतोष रखे, कल्याणी कुलकर्णी, रामेश्वर काकडे, अक्षय गाभूड, स्वाती नरके, मनीषा सोनटक्के, ऐश्वर्या जाधव, वैष्णवी देशमाने, रूपाली गायकवाड, भाग्यश्री हकम, राजेंद्र वाकडे, सुशील थोरे, अमोल आव्हाड यांनी परिश्रम घेतले.

# देवश्री भुजबळची कोलंबिया युनिव्हर्सिटीत निवड

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : गेली 7 वर्षे इंग्रजी पत्रकारितेत काम करत असलेल्या देवश्री देवेंद्र भुजबळ हिची अमेरिकेतील अत्यंत प्रख्यात अशा न्यूयॉर्क स्थित कोलंबिया युनिव्हर्सिटीमध्ये मास्टर्स इन जर्नालिझमसाठी निवड झाली आहे. या युनिव्हर्सिटीची निवड प्रक्रिया अत्यंत



कठीण असून, मुंबईतून निवड झालेली देवश्री ही एकमेव असून लवकरच ती रवाना होत आहे. तिच्या निवडीबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

देवश्रीने डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी होण्याच्या मळलेल्या वाटा न निवडता आपली आवड ओळखून इंग्रजी साहित्य घेऊन रुईया महाविद्यालयातून बी ए ची पदवी घेतली. त्यानंतर आफ्टरनून, फ्री प्रेस जर्नल, डी एन ए (झी मीडिया), एशियेन एज (डेक्कन क्रोनिकल) वर्तमानपत्रे, टिव्ही 9 आदी ठिकाणी पत्रकार, सिनिअर कोरोस्पॉडंट म्हणून, तसेच दुबई येथे काही काळ सोशल मीडिया मॅनेजर म्हणून उल्लेखनीय काम केले आहे.

मुंबईतील नागरी समस्यांवर संशोधनपूर्ण लेखन केल्याबद्दल तिला मुंबई मराठी पत्रकार संघाचा 2017 चा आप्पा पेंडसे पुरस्कार मिळालेला आहे. देवश्री कासार समाजातील पहिली इंग्रजी पत्रकार असून, 2019 साली तिचा पुणे कासार समाजातर्फे स्वयंसिद्धा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. देवश्रीने सुरू केलेले न्यूजस्टोरीटुडे हे वेब पोर्टल हे अल्पवधीत लोकप्रिय झाले असून या वेब पोर्टलला पत्रकारितेतील मानाचा असा, चौथा स्तंभ पुरस्कार मिळाला आहे. देवश्रीला तिच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

# पहिल्या श्रावण सोमवारी धनकेश्वर मंदिरात भक्तांची गर्दी



आधुनिक केसरी न्यूज

पुसद : तालुक्यातील भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या येथील पुरातन हेमाडपंथी धनकेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त दर सोमवारी पहाटेपासूनच शंकराच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. गत दोन वर्षांपासून कोरोनामुळे येथील शिवमंदिर मंदिर लॉकडाउन असल्याने शिवभक्तांची मांदियाळी थांबण्याबरोबरच चुकून आलेल्या भक्तांना गाभाऱ्यातील पिंडीचे दर्शन न घेताच दुरूनच दर्शन घेऊन आल्यापावली परत जावे लागत होते. परंतु यावर्षी भक्तांना थेट गाभाऱ्यात जाऊन शिवलिंगाचे दर्शन घेता येत आहे.

धनकेश्वर येथील महादेव मंदिर १०० वर्षापूर्वी भूगर्भात असलेले शिवलिंग आहे. एका शिव भक्ताला दृष्टांत झाल्यामुळे या ठिकाणी महान तपस्वी श्रीपती महाराज, राधा माय व अन्य भक्तांच्या समक्ष ओढ्यालगत भूगर्भात सात ते आठ फूट खोदकाम करून शिवलिंग मोकळे करण्यात आले. त्यानंतर १९५० मध्ये भक्तांच्या सहकार्याने शिव मंदिराची उभारणी करण्यात आली. जमिनीपासून सात ते आठ फूट खोलीत असलेल्या भूगर्भातील शिवलिंग हे पाण्याने पूर्णपणे वेढल्या जात असल्याने त्याच्या दोन बाजूला खूप खोल असे दोन कुंड बांधण्यात आले. मागील दहा वर्षांपूर्वी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे तीर्थक्षेत्र विकास निधीमधून विशाल सभामंडपाचे काम पूर्ण झाले. सभामंडपात सहा देवी देवतांची मंदिरे आहेत. तर परिसरात दुर्गा माता, हनुमान मंदीर असून यंदा भजन, कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले आहे.

शिवलिंगाच्या दर्शनासाठी पंचक्रोशीसह तालुक्यातील हजारो भाविकांची गर्दी दिसून आली. जय शंकर ! जय भोले ! गजरात स्वयंभू असलेल्या शिवलिंगाच्या पिंडीवर बेलफुल अर्पण करून मनोभावे पूजनश्रावण महिन्यात या ठिकाणी जणू काही यात्रेचे स्वरूप आहे. संस्थानतर्फे दरवर्षी दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थानचे अध्यक्ष व मंडळातील सदस्य पुढाकार घेत आहेत.

# शेतात रोह्यांचा हैदोस; वन्य प्राण्यांचा वनविभागाने बंदोबस्त करण्याची सुरेश चव्हाण यांची मागणी

## अन्यथा कार्यालयात ठिय्या आंदोलनाचा इशारा !

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** देव्हारी, सावळदबारा, घाणेगाव तांडा या परिसरात रोही या प्राण्यांनी प्रचंड खूप मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांच्या शेतामध्ये नासाडी करून हैदोष घातला असून पिकांचे वन्यप्राण्यापासून संरक्षण व्हावे यासाठी अनेक शेतकरी रात्रीच्या वेळेला जीवाची परवा न करता गस्त घालत आहे. सोयगाव तालुक्यातील, देव्हारी, सावळदबारा, नांदा तांडा, घानेगाव, टिटवी, पिंपळवाडी परिसरातील जवळपास सर्वच शेतकऱ्यांच्या या समस्या आहेत.

जवळपास दोनशे ते तीनशे रोही प्राण्यांचा कळप एकाच शेतामध्ये येतो व सोयाबीन तूर व इतर पिके फस्त करून जातो. यामुळे अगोदरच दुबार आणि तिबार पेरणी केलेल्या काही शेतकऱ्यांचे अगोदरच आर्थिक कंबरडे मोडले आहे आणि यातही रोही प्राण्यांचा आहे हैदोष सुरूच आहे. अनेक शेतकरी शेतातील पिकांचे वन्यप्राण्यापासून संरक्षण व्हावे व हातातून पिक आलेला घास जाऊ नये म्हणून पावसाची जीवाची परवा



न करता अनेक शेतकरी रात्रीला शेतामध्ये गस्त घालत आहे. सोयगाव तालुक्याचे वन प्रादेशिक कार्यालय येते. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज असून वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुद्धा करणे गरजेचे आहे. तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजना भरण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी महा-ई-सेवा केंद्रावर गर्दी केली असून, काही तांत्रिक अडचणीमुळे सुद्धा अनेक शेतकऱ्यांचा पिक विमा भरावयाचा राहिलेला आहे. 31 जुलै पिक विमा भरण्याची शेवटची तारीख असून ही तारीख वाढवून देण्याची मागणी सुरेश चव्हाण यांनी केली आहे. शिवाय वन्य प्राण्यांचा बंदोबस्त वनविभागाने करावा अन्यथा वन विभागाच्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सुद्धा सामाजिक कार्यकर्ता सुरेश चव्हाण यांनी दिला आहे.



# आ.फारुक शाह यांच्या हस्ते पादचारी पुलाच्या कामाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कमलाबाई विद्यालय या परिसरात मोठे अपघात घडत होते. त्यामुळे पालकांची मागणी लक्षात घेवून आमदार शाह यांनी परिसरातील सर्व मुख्याध्यापक व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पादचारी पुलाच्या कामाचे उद्घाटन केले. शहरातील कमलाबाई कन्या शाळेपासून ते बाफना शाळेपर्यंत तयार करण्यात येत असलेल्या या पादचारी पुलाचे उद्घाटन करताना आमदार फारुक शहा यांच्यासह नगरसेवक नासिर पठाण सईद बेग, गनी डॉलर, साजिद साई, साहिर पत्रकार, आसिफ मुल्ला, शाहिद शहा, निसार अन्सारी, निजाम सय्यद, साजिद अन्सारी, शहा, खालिद अन्सारी, अलीम अन्सारी, कैंसर पेंटर, दीपा नाईक, मुख्याध्यापिका मनीषा जोशी, कल्पना मोरे, मनीषा ठाकरे, सापना मानेकर आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार शाह म्हणाले की, आमदार निधीतून ४५ लाख रुपये खर्चातून हा पादचारी पूल तयार करण्यात येणार आहे तसेच उचदाबाच्या वीजवाहिन्या भूमिगत करणेसाठी १९ लाख रुपये खर्च होईल. हा निधी जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर करण्यात आला आहे. बऱ्याच वर्षांपासून विद्यार्थीनींना कमलाबाई शाळा चौकातून रस्ता ओलांडताना अडचण येत होती. प्रसंगी अपघातही घडत होते. यासंदर्भात पालकांनी माझ्याकडे अनेकदा तक्रारीही केल्या होत्या. त्यामुळे पालकांची मागणी लक्षात घेत आम्ही सर्व शाळांचे मुख्यध्यापकांना सोबत घेवून निर्णय घेतला की, कमलाबाई कन्या शाळेपासून ते बाफना शाळेपर्यंत पादचारी पुल तयार करायचा. त्यानुसार आज आम्ही सर्व शाळांचे मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत पुलाचे उद्घाटन केले. येत्या सहा महिन्यात हा पूल पूर्ण होईल, असे आमदार फारूक शाह यांनी सांगितले.

# धार्मिक कार्यात नेहमी सहकार्य राहील : सागर जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील जागृत हनुमान मंदिर येथे आयोजित साई चरित्र वाचन वर्षे ०९ वे या निमित्ताने जिजामाता शिक्षण प्रसार मंडळाचे सचिव सागर जाधव यांना आरती करण्याचा योग मिळाला. त्याच्या हस्ते साईबाबांची आरती करण्यात आली. या निमित्ताने यावेळी शहरातील 418 महीला महापारायण आध्याय वाचनसाठी सहभाग नोंदवला असून आलेल्या सर्व साई भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी बंटी सुरे, बापू शहरवाले, योगेश त्रिभुवन, विकी पाटील, अर्जुन निकम, राम देशमुख, अल्केश नवले, दिनेश बाविस्कर व महिला साई भक्तांची उपस्थिती होती.

# कमलनयन बजाज रुग्णालयाने सुरू केले रोबोटिक-असिस्टेड सर्जरी युनिट

## रोबोटिक सर्जरीमध्ये अत्याधुनिक चौथ्या पिढीचे तंत्रज्ञान; मराठवाड्यातील पहिली आणि एकमेव जागतिक कीर्तीची 'दा विंची रोबोटिक सर्जिकल सिस्टीम'

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने, मराठवाडा व परिसरातील रुग्णांना वैद्यकीय तंत्रज्ञानातील सर्वोत्कृष्ट म्हणून ओळखले जाणारे जागतिक दर्जाचे रोबोटिक सहाय्यक शस्त्रक्रिया सुविधा देण्याची घोषणा करण्यात आली आहे. रुग्णालयाने अमेरिका स्थित, नाविन्यपूर्ण अशी आरएएस तंत्रज्ञानांपैकी एक, दा विंची एक्स प्रणाली स्थापित केले आहे. मराठवाड्यातील आणि आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णांना वाजवी दरात प्रगत आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी ही अत्याधुनिक प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या अत्याधुनिक युनिटविषयीची माहिती देताना विश्वस्त आणि व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सी.पी. त्रिपाठी म्हणाले, विविध प्रकारच्या आजारांचे निदान करण्यासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाने सर्वोत्तम सुविधा देण्यावर भर दिला आहे. त्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाची गरज पूर्ण करण्यासाठी आम्ही आधुनिक रोबोटिक- सहाय्यक शस्त्रक्रिया प्रणालींपैकी एक स्थापित केली आहे. दा विंची एक्स (चौथे जनरेशन सिस्टीम) जी अनेक जटिल शस्त्रक्रियांच्या बाबतीत अत्यंत फायदेशीर आहे. यामुळे मराठवाड्यातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे रुग्णाचे होणारे आर्थिक नुकसानही न होता सर्वोत्तम शस्त्रक्रिया उपचार मिळू शकतील. मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. नताशा वर्मा म्हणाल्या की, रोबोटिक-सहाय्यक शस्त्रक्रियेचे अनेक फायदे आहेत. जसे की लहान चीरे आणि कमी रक्तस्त्राव, ज्यामुळे जखम अत्यंत कमी काळात जुळून येते व रुग्णाला होणारा त्रासही कमी होतो. या तंत्रज्ञानामुळे शल्यचिकित्सकांना थ्रीडी हाय डेफिनेशन दृश्यासह अधिक अचूकतेने शस्त्रक्रिया करण्यास मदत होते. कारण ते त्यांना अंतर्गत अवयवांना अधिक चांगले दृश्यमानता प्रदान करते. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला वेदना कमी होतात. रुग्णालयातील अत्यंत अनुभवी शल्यचिकित्सक आता नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत आणि सर्वोत्तम रुग्णसेवा प्रदान करण्यास उत्सुक आहेत.



कमलनयन बजाज रुग्णालयामध्ये रोबोटिक सहाय्यक सर्जरीच्या सुविधेविषयी बोलताना इन्टिट्यूव्ह इंडियाचे व्हाईस प्रेसिडेंट व जनरल मॅनेजर, मनदीप सिंग कुमार म्हणाले की, कमलनयन बजाज रुग्णालय मराठवाड्यातील सर्व घटकांपर्यंत सर्वोत्कृष्ट सर्जिकल तंत्रज्ञान पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे हे खरोखरच कौतुकास्पद आहे. इन्टिट्यूव्हचा विश्वास आहे की, या तंत्रज्ञानामुळे शल्यचिकित्सकांना अनेक जटिल शस्त्रक्रिया सहजतेने करण्यास सक्षम केले जाऊ शकते. म्हणूनच, कमलनयन बजाज रुग्णालयासारख्या अग्रगण्य आरोग्य सेवा संस्था, रोबोटिक-सहाय्यक शस्त्रक्रियेसाठी, विशेषतः सुधारित वैद्यकीय परिणामांसाठी ओळखल्या जाणाऱ्या, दा विंचीः या नवीनतम तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्यास तयार असल्याचे पाहून आम्ही प्रोत्साहित होतो. इन्टिट्यूव्ह रोबोटिक प्रोग्रामच्या स्थापने द्वारे, रुग्णालयाची दूरदृष्टी आणि आमच्या तंत्रज्ञानावरील विश्वास, तसेच डॉक्टरांना प्रभावी उपचार करण्यास मदत करण्याची त्यांची सक्रियता दर्शवते.

गेल्या काही वर्षांपासून भारतात रोबोटिक सहाय्यक शस्त्रक्रियेची मागणी वाढत आहे. ही मागणी केवळ रोबोटिक-सहाय्यित शस्त्रक्रिया प्रदान करू शकणाऱ्या सुधारित रुग्ण परिणामांच्या संभाव्यतेमुळेच नव्हे, तर भारतातील सर्जन समुदायातील उत्कट आणि कुशल रोबोटिक सर्जनच्या वाढत्या संख्येच्या साक्षीने तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या उत्साहाने देखील प्रेरित आहे.

आरएएसच्या फायद्यांवर भाष्य करताना, वरिष्ठ कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. राजेश सावजी म्हणाले, रोबोटिक-असिस्टेड सर्जरी (RAS) शल्यचिकित्सकांना अधिक अचूक, लवचिकता आणि नियंत्रणासह अनेक प्रकारच्या जटिल शस्त्रक्रिया करण्याची क्षमता प्रदान करू शकते. अधिक शस्त्रक्रिया क्षमता आणि रुग्णाच्या सुधारित परिणामांची संभाव्यता ही दोन कारणे आहेत ज्यामुळे आम्ही आरएएसला प्राधान्य देतो, विशेषतः ज्या प्रक्रियेसाठी अचूक शस्त्रक्रिया हस्तक्षेप आवश्यक असतो. यामध्ये कर्करोगाच्या गंभीर प्रकारांशी संबंधित प्रक्रियांचा समावेश आहे जो या भागात अधिकाधिक सामान्य होत आहेत. रुग्णांना आरएएसचे काही फायदे म्हणजे लहान चीरे, कमी जखम आणि कमी वेदना. या तंत्राचा वापर करून अन्ननलिका, आतडे, गुदाशय, गर्भाशय, किडनी व ईतर जटिल कर्करोग शस्त्रक्रिया अधिक प्रभावीपणे करता येतात. परिणामी, रुग्णाचा रुग्णालयातील कालावधी कमी तसेच जलद गतीने रोगमुक्तता करण्यास मदत होते.

कमलनय बजाज रुग्णालयात आम्ही मागील चार महिन्यात या रोबोटिक प्रणालीच्या तंत्राद्वारे अन्ननलिका, किडनी, प्रोस्टेट तसेच कर्करोग रुग्णाची आंशिक मूत्रपिंड काढून टाकण्याची शस्त्रक्रिया ई. शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या. विशेष बाब म्हणजे, किडनी दात्याची आंशिक मुत्रपिंड काढुन टाकण्याची रोबोटिक शस्त्रक्रिया करणारे कमलनयन बजाज रुग्णालय हे मराठवाड्यातील पहिलेच केंद्र आहे.

तंत्रज्ञान वापरण्याबाबत बोलताना डॉ. आदित्य येळीकर, युरोसर्जरी व किडनी प्रत्यारोपण शल्यचिकित्सक म्हणाले, आम्ही हॉस्पिटलमध्ये सादर केलेल्या नवीनतम दा विंची तंत्रज्ञानाद्वारे शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात पुढचे पाऊल टाकले आहे. आम्ही रुग्णाला कमी वेदना, कमी रक्तस्त्राव होणे, हॉस्पिटलमधील कालावधी आणि शस्त्रक्रियेनंतरची अस्वस्थता लक्षणीयरीत्या कमी करणे, याबाबतीत चांगले परिणाम पाहत आहोत. हे फायदे, मला आणि माझ्या टीमला आमच्या रुग्णांना सामान्य जीवनप्रणाली लवकर अवलंबवण्यास सक्षम बनवतात.

डॉ. ए.एम ढमढेरे वरिष्ठ शल्यचिकित्सक व मूळव्याध शल्यचिकित्सक, डॉ. मिलिंद वैष्णव - वैद्यकीय संचालक, डॉ. प्रेरणा देवधर - स्त्रीरोग तज्ज्ञ आणि डॉ. शिवाजी तौर, शल्यचिकित्सक याप्रसंगी उपस्थित होते आणि त्यांनी रोबोटिक शस्त्रक्रियेच्या अनुषंगाने, येणाऱ्या कालावधीत रुग्णांना होणाऱ्या फायद्याबद्दल आश्वास्तता दर्शवली. कमलनयन बजाज रुग्णालय हे तीन दशकांपासून वैद्यकीय तंत्रज्ञानामध्ये नेहमीच आघाडीवर आहे आणि नवीनतम निदान, वैद्यकीय व शस्त्रक्रिया उपकरणे आणि प्रगत प्रक्रियात्मक सुविधांची संपूर्ण श्रेणी प्रदान करते. हे रुग्णालय उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे आणि औरंगाबादमधील एक विश्वासार्ह सेवा देणारे रुग्णालय म्हणून विकसित झाले आहे. याच्या स्थापनेमुळे, मराठवाड्यातील रुग्णांना तज्ञ वैद्यकीय सेवा आणि उपचारांचा लाभ घेण्यासाठी प्रवास करण्याची किंवा कोणत्याही गैरसोयीला सामोरे जाण्याची गरज पडणार नाही, यासाठी रुग्णालय लोकांना संपूर्ण आरोग्य सेवा देण्याच्या आपल्या प्रमुख उद्दिष्टासाठी वचनबद्ध आहे.



## हर घर तिरंगा अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे : रत्नाबाई चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत घाणेगाव तांडा गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या



घरावर आपल्या भारत देशाचा राष्ट्रध्वज असलेला तिरंगा ध्वज फडकावा असे आवाहन ग्रामपंचायत सरपंच रत्नाबाई सुरेश चव्हाण यांनी केले आहे. आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे गत वर्षभरापासून शासनाच्या वतीने विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. यावेळी ग्रामसेवक एस.ए. रणसिंग हे उपस्थित होते.

भारत के आझादी का अमृत महोत्सव उपक्रमा अंतर्गत दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान घाणेगाव तांडाचे सरपंच रत्नाबाई सुरेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व घाणेगाव गावाचे ग्रामसेवक एस.ए. रणसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली घाणेगाव गावात "हर घर तिरंगा"अभियान राबविण्यात येणार असून या अभियानात घाणेगाव गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावा व राष्ट्रीय भावना राष्ट्रप्रेम जोपासावे असे आवाहन ग्रामसेवक एस.ए. रणसिंग यांनी केले आहे. यासाठी घाणेगाव तांडा ग्रामपंचायत अंतर्गत जनजागृती करण्यासाठी घाणेगाव बचत गटांच्या महिला, घाणेगाव तांडा ग्रामपंचायत चे कर्मचारी गावात प्रभात फेरी काढणार आहेत, अशी माहिती रत्नाबाई सुरेश चव्हाण यांनी दिली तर तसेच घाणेगाव तांडा येथल हर घर तिरंगा अभियान दि. १३ ऑगस्ट ते १५ दरम्यान राबविण्यात येणार असून नागरिकांनी तिरंगा ध्वजाची खरेदी घाणेगाव तांडा ग्रामपंचायत विविध महिला बचत गटाच्या स्टॅलवरून खरेदी करावे असे आवाहन सरपंच रत्नाबाई सुरेश चव्हाण यांनी केले आहे.

## लोहगड ग्रा.पं. च्या विकास कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा संशय...!

आधुनिक केसरी न्यूज

**जिल्हा परिषद प्रशासनाने दिले चौकशीचे आदेश**

**धुळे :** तालुक्यातील लोहगड येथे ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या विकास कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने याबाबत पत्रकार संघाच्या मागणीनुसार जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशी संदर्भात पंचायत समिती प्रशासनाला पत्र पाठवले आहे तसेच लवकरात याबाबत सखोल चौकशी करून अहवाल देण्याबाबत आदेशित केले आहे. लोहगड येथील स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने गावातील विकास कामासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने लोकशाही मराठी पत्रकार संघाने पुढाकार घेत जिल्हा परिषद प्रशासनाला पाठपुरावा करत संबंधित ग्रामपंचायतिने केलेल्या 2015 ते 2022 पर्यंतच्या विकास कामांची सखोल चौकशी करावी अशी मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत धुळे जिल्हा परिषद प्रशासनाने धुळे पंचायत समितीला पत्र पाठवत संबंधित ग्रामपंचायतची सखोल चौकशी करून अहवाल जमा करावा असे आदेशित केले आहे. तसेच दोषी आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करावे, अशी मागणी ही लोकशाही मराठी पत्रकार संघाच्या वतीने प्रशासनाला करण्यात आली आहे.

## बहुजन संग्राम परिषदेतर्फे धुळ्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या 102 वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी केली जात आहे. धुळ्यातील लेनिन चौकात आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा यासाठी बहुजन संग्राम परिषदच्या वतीने जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना निवेदन देण्यात आले. क्युमाईन क्लब येथे मागणीसाठी धरणे आंदोलन संघटनेतर्फ करण्यात येत आहे.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठेच्या कार्याला उजाळा देत आज दि.1 ऑगस्ट रोजी साहित्यरत्न आण्णाभाऊ साठेंच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी मातंग समाजाला न्याय मिळावा, यासाठी बहुजन संग्राम परिषदेचे शहराध्यक्ष विनोद जाधव, विनोद बाविस्कर, अंकुश केंदाळे, राजु गायकवाड, महेंद्र चांदणे, बबलू नवगिरे, आकाश रामराजे, सागर जाधव, मोहसीन शेख, नेहरु जाधव आदी पदाधिकारी एक दिवसीय आंदोलन करीत आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### पुरुषांमधील लैंगिक दोष...

आधुनिक केसरी

**फायमोसिस :** पुरुषांमध्ये प्रामुख्यानं आढळणारा दोष म्हणजे फायमोसिस. यामध्ये पुरुषांच्या अवयवांची त्वचा पूर्णपणे मागे न जाणे, त्वचा मागे जाताना खूप त्रास होणे, त्वचेला तडे जाऊन जखमा होणे, तेथे रक्तस्त्राव होणे अशी विविध लक्षणे आढळतात. पॅराफायमोसिस - पुरुषांमध्ये आणखी एक दोष आढळून येतो ज्याला पॅराफायमोसिस असं म्हणतात. या दोषामध्ये पुरूषांच्या अवयवावर असणारी त्वचा आजारांमुळे किंवा वारंवार मागे जाऊन त्वचेला सूज येते त्यालाच पॅराफायमोसिस असे म्हटले जाते. पेरॉनिज प्लेक - काही कारणांमुळे पुरुषांच्या अवयवांमध्ये गाठी निर्माण होतात आणि त्याला वाकडेपणा येतो. अवयवाला कठोरता आली की वेदना होतात. वैद्यकीय परिभाषेमध्ये यालाच पेरॉनिज प्लेक असं म्हटलं जातं, या दोषावर स्टेम सेल थेरपी, पेनाईल लिथोट्रिप्सी यासारखे अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. आता यातील काही दोष असे आहेत जे लहानपणापासून आढळतात किंवा लहान बाळांमध्ये आढळतात, आता आपण ते पाहूया.

**हायपोस्पॅडिअस :** या दोषामध्ये रुग्णाचे जन्मतःच लघवीचे छिद्र अवयवाच्या खालच्या बाजूला असणे, ते आकाराने लहान असणे आणि त्यामुळे लघवीची धार पायावरच पडणे अशी लक्षणे दिसून येतात. या रुग्णांच्या लिंगामध्ये वाकडेपणासुद्धा आढळतो. जर या रुग्णांच्या अवयवाची लहानपणीच शस्त्रक्रिया केली गेली नाही तर या रुग्णांना मोठेपणी शारीरिक क्रिया आणि वीर्यपतनासंबंधीच्या समस्या उद्भवतात. त्यामुळे योग्य डॉक्टरांच्या सल्ल्याने वयाची दोन वर्षे पूर्ण झाली की अशा रुग्णावर शस्त्रक्रिया करून घेणे फायदेशीर ठरते. अनडिसेंडेड टेस्टीज - बऱ्याचदा लहान मुलांचे एक किंवा दोन्ही टेस्टिकल्स लिंगाच्या खालच्या बाजूस असलेल्या पोती किंवा पिशवीत (स्क्रोटम) मधे आलेले नसतात. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com